



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com






* वर्ष ६४ वे * अंक १७३ * नांदेड * रविवार, दि. २९ जून २०२५ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


# येत्या दोन दिवसांत पावसाचा जोर वाढणार, नांदेडसह राज्यभर पावसाचे हायअलर्ट



**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यात गेल्या दोन दिवसांपासून पाऊस पुन्हा सक्रिय झाला आहे. कोकणपट्टी तसेच मुंबई ठाणे व उपनगरात शनिवारी सकाळपासून पावसाची संततधार होती. मुंबई, ठाणे, पालघरसह तळकोकण, मराठवाड्यातील नांदेड, जालना, परभणी, हिंगोलीसह विदर्भात पावसाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. शुक्रवारी झालेल्या पावसामुळे विदर्भात शेती पिकांचे प्रचंड नुकसान झालं आहे. हवामान खात्याचा अंदाजानुसार पुढील दोन दिवस पावसाचा जोर कायम राहणार आहे.

हवामान विभागाच्या अंदाजानुसार कोकण गोवा व मध्य महाराष्ट्रातील घाट परिसरात मुसळधार अती मुसळधार पावसाची शक्यता आहे. पुढील ७ दिवस या भागात पावसाला पोषक स्थिती आहे. उत्तर महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील काही जिल्हांमध्ये पावसाचा तीव्र अलर्ट आहे. तर पुढील दोन दिवसांत मुंबई, ठाणे, सिंधुदुर्ग, छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, नांदेड, हिंगोली, जळगाव, धुळे, नंदुरबार आणि संपूर्ण विदर्भात पावसाचा येलो अलर्ट देण्यात आला.

काल रात्रीपासून विदर्भातील ११ जिल्ह्यांमध्ये जोरदार पाऊस पडत आहे. पुढील २४ तासांतही मुसळधार पावसाची शक्यता आहे. मराठवाड्यातील काही जिल्ह्यांमध्ये मागील दोन दिवसांपासून पावसाची रिपरिप सुरू आहे. येत्या २४ तासांत या भागातही मुसळधार पावसाचा अंदाज हवामान विभागाने दिला आहे.

तळ कोकणासह मुंबई, ठाणे, पालघर पुणे व सातारा घाट परिसरात मुसळधार पावसाची शक्यता आहे. पुढील दोन दिवस राज्यात पावसाचा जोर वाढणार असून विविध ठिकाणी हायअलर्ट देण्यात आले आहेत.

# हिंदी सक्तीविरोधातील मोर्चास शरद पवारांचा पाठिंबा

**मुंबई (प्रतिनिधी)–** राष्ट्रवादी शरद पवारांच्या पक्षाने देखील ५ जुलैच्या मोर्चाला पाठिंबा दिला आहे. त्यामुळे राज ठाकरे आणि उद्धव ठाकरेंसह शरद पवार देखील मोर्चात सामील होणार का?, असा सवाल उपस्थित होत आहे. याचदरम्यान राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी महत्वाची माहिती दिली आहे.

हिंदीच्या मुद्द्यांवरुन मुंबईत ५ जुलै रोजी मोर्चा काढण्यात येणार आहे. मनसेप्रमुख राज ठाकरे आणि शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे एकत्रित मोर्चा काढणार आहेत. ठाकरे बंधूंच्या या मोर्चाला आता राज्यातील विविध राजकीय नेत्यांसह कलाकार, साहित्यिक, तज्ज्ञांचा पाठिंबा मिळत आहे.

मराठी भाषेबाबत खूप गांभीर्याने घेण्याचा विषय आहे. मी देखील एसएससी बोर्डाद्वारे शिक्षण घेतलं आहे. एसएससी बोर्ड एक उत्तम बोर्ड आहे. देशभरता चांगला नाव आहे. मात्र तरीही त्यात बदल लादले जात आहे, असं सुप्रिया सुळे म्हणाल्या. तसेच हिंदीच्या मुद्द्यावरुन मुंबई होणाऱ्या ५ जुलैच्या मोर्चाला आमच्या पक्षाने पाठिंबा दिला आहे. पूर्ण ताकदीने आमचा पक्ष या मोर्चात सहभागी होणार असल्याचं सुप्रिया सुळेंनी सांगितले. तसेच शरद पवार सहभागी होणार की, नाही ते आज उद्यापर्यंत कळेल, अजून वेळ आहे, अशी माहिती सुप्रिया सुळेंनी दिली. जयंत पाटील याबाबत सविस्तर माहिती देतील, असंही सुप्रिया सुळेंनी सांगितलं.

मराठीच्या समर्थनार्थ पुकारलेल्या ५ जुलै रोजीच्या मोर्चाला राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाने पाठिंबा दर्शविला आहे. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंतराव पाटील यांनी एक पत्र ट्विट करत भूमिका स्पष्ट केली आहे. प्रदेशाध्यक्ष जयंतराव पाटील आपल्या पत्रात म्हटले आहेत की, महाराष्ट्रहिताचा प्रश्न उभा राहतो तेव्हा महाराष्ट्रासाठी आणि जेव्हा राष्ट्रहिताचा प्रश्न उभा राहतो तेव्हा राष्ट्रासाठी पक्षीय भेदाभेद बाजूला सारून उभं राहणं हेच 'राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार' पक्षाचं स्पष्ट धोरण आहे असे त्यांनी सांगितले.

# भाजपच्या प्रदेशाध्यक्षपदी रविंद्र चव्हाण यांची होणार नियुक्ती

## १ जुलैला घोषणा



**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्य भाजप कार्यकारिणीमधील उत्सुकता अखेर संपली असून भाजपला मिळणार नवा प्रदेशाध्यक्ष मिळणार आहे. भाजप प्रदेशाध्यक्षपदी रविंद्र चव्हाण यांची नियुक्ती होणार आहे. रविंद्र चव्हाण प्रदेशाध्यक्षपदासाठी ३० जूनला अर्ज भरणार आहेत. १ जुलैला नियुक्ती जाहीर केली जाणार आहे. वरळी डोम येथे एक जुलैला सकाळी ११ वाजता अधिकृत घोषणा होणार आहे. यावेळी भाजपचे सर्व प्रमुख पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. दरम्यान, राष्ट्रीय अध्यक्ष निवडण्याच्या दिशेने पाऊल टाकत, भाजपने शुक्रवारी महाराष्ट्र, उत्तराखंड आणि पश्चिम बंगालमधील संघटनात्मक निवडणुकांवर देखरेख करण्यासाठी दोन केंद्रीय मंत्री आणि एक माजी केंद्रीय आणि विद्यमान खासदार यांची राज्य निवडणूक अधिकारी म्हणून नियुक्ती केली. या निवडणुका पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाच्या बहुप्रतिक्षित निवडणुकीची पूर्वसूचना आहेत.

भाजप ओबीसी मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि पक्षाचे राष्ट्रीय निवडणूक अधिकारी (एनईओ) डॉ. के. लक्ष्मण यांनी केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू आणि हर्ष मल्होत्रा आणि माजी केंद्रीय मंत्री रविशंकर प्रसाद यांची महाराष्ट्र, उत्तराखंड आणि पश्चिम बंगालचे राज्य निवडणूक अधिकारी म्हणून अनुक्रमे नियुक्ती केली आहे. ते राज्य पक्षाध्यक्षांच्या निवडणुकीचे तसेच राष्ट्रीय परिषद सदस्यांच्या निवडणुकीचे पर्यवेक्षण करतील. राष्ट्रीय निवडणुकीच्या तयारीचा भाग म्हणून गुजरात, उत्तराखंड, तेलंगणा, त्रिपुरा, महाराष्ट्र, आंध्र प्रदेश आणि इतर अनेक राज्यांमध्ये प्रदेश अध्यक्षांची नियुक्ती झाल्यानंतर, पक्ष १५ जुलैपर्यंत आपल्या नवीन राष्ट्रीय अध्यक्षांची घोषणा करण्याची शक्यता आहे. नवीन राष्ट्रीय अध्यक्षांच्या निवडीनंतर पंजाब आणि दिल्लीला त्यांचे नवीन प्रदेशाध्यक्ष मिळतील. गुजरात आणि उत्तर प्रदेशसाठी घोषणा ४ ते ११ जुलै दरम्यान होऊ शकतात. भाजपचे केंद्रीय नेतृत्व शक्य तितक्या लवकर संघटनात्मक निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्याचा विचार करत आहे.

# मुंबई बॉम्बस्फोटातील दहशतवादी साकिब नाचनचा दिल्लीत मृत्यू

**मुंबई (प्रतिनिधी)–** कुविख्यात दहशतवादी म्हणून ओळखला जाणारा साकिब नाचण याचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. भिवंडी तालुक्यातील पडघा-बोरिवली हे साकिब नाचण याचं मूळगाव आहे. त्यानंतर, बोरिवली आणि पडघा या दोन्ही ठिकाणी २०० हून अधिक पोलिसांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला असून गावात येणाऱ्या प्रत्येक वाहनांची तपासणी सुरू केली आहे. मुंबई सिरीयल बॉम्ब ब्लास्टमध्ये साकीब नाचन हा मुख्य आरोपी होता.

# अभिनेत्री शेफालीचे हृदयविकाराने निधन



**मुंबई (प्रतिनिधी)–** 'कांटा लगा गर्ल' आणि 'बिग बॉस १३' मधील स्पर्धक शेफाली जरीवाला (४२) हिचं हृदयविकाराच्या झटक्यानं निधन झालं आहे. शेफालीची प्रकृती खालावल्यानंतर तिचे पती पराग त्यांनी यांनी तिला कूपर रुग्णालयात नेले. परंतु रुग्णालयातील डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. शेफालीच्या मृत्यू संपूर्ण मनोरंजन क्षेत्रात हळहळ व्यक्त केली जात आहे.

२००२ मध्ये 'कांटा लगा' या अल्बममधील गाणे रिलीज झाले आणि ते रिलीज होताच सर्वांच्या पसंतीस उतरले. या गाण्यात शेफाली जरीवालाचा बोल्ड लूक पाहायला मिळाला होता. या गाण्यामुळे शेफाली जरीवालाला चांगली प्रसिद्धी देखील मिळाली होती. १९६४ सालच्या समझौता या सिनेमातील प्रसिद्ध गाणे कांटा लगाचे हे रीक्रएटेड व्हर्जन होते. हे गाणे प्रसिद्ध गायिका लता मंगेशकर यांनी गायले होते. तर कल्याणजी-आनंदजी यांनी संगितबद्ध केले होते.

शेफाली जरीवाला हिचा जन्म १५ डिसेंबर १९८२ रोजी गुजरातमधील अहमदाबादमध्ये झाला होता. शेफाली जरीवाला अनेक रिॲलिटी शोज, चित्रपट, गाण्यांचे अल्बममध्ये दिसून आली होती. नच बलिए ५ आणि नच बलिए ७ मध्येही शेफाली जरीवालाने सहभाग घेतला होता. २०१९ मध्ये बिग बॉस १३ मध्येही स्पर्धेक म्हणून शेफाली दिसली होती. शेफाली जरीवालाचे दोन लग्न झाले होते.

# वैजापुरमध्ये आश्रमात घुसून महिला कीर्तनकाराची निर्घृण हत्या

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) –** एका महिला कीर्तनकारची डोक्यात दगड घालून हत्या करण्यात आल्याची घटना छत्रपती संभाजीनगरमधील वैजापूरच्या चिंचडगाव शिवारात शनिवारी सकाळी साडे सहावाजेच्या सुमारास घडली आहे. हभप संगीताताई अण्णासाहेब पवार (५०, रा. चिंचडगाव) असे घटनेतील मयत कीर्तनकार महिलेचे नाव आहे.

या घटनेबाबत मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, हभप संगीताताई पवार या चिंचडगाव येथील सदगुरू नारायणगिरी महाराज कन्या आश्रम येथे वास्तव्यास होत्या. संगीताताई पवार यांच्यावर मारेकऱ्यांनी आश्रमात घुसून दगडाने वार केल्याचे समोर आले आहे. शनिवारी सकाळी आश्रमातील मंदिरातील पुजारी शिवाजी चौधरी हे नेहमीप्रमाणे मंदिरात पूजेसाठी आले होते. त्यांनी हभप संगीताताई पवार यांना आवाज दिला. मात्र, त्यांनी प्रतिसाद न दिल्याने मंदिराशेजारी असलेल्या शेडमध्ये जाऊन बघितले.

यावेळी हभप संगीताताई पवार या रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या होत्या. मंदिरातील पुजारी शिवाजी चौधरी यांनी याबाबत पोलिसांना माहिती दिली. घटनेची माहिती मिळताच वीरगाव पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक शंकर वाघमोडे यांनी पथकासह घटनास्थळी धाव घेतली. श्वान पथक, व फॉरेन्सिक टीमला पाचारण करण्यात आले. उपविभागीय पोलीस अधिकारी फुंदे यांनी देखील घटनास्थळी धाव घेतली.

याबाबत भाऊ कृष्णा पवार म्हणाले की, महाराज या भागवत कथेसाठी २००९ आणि २०१० साली दोन वर्ष वृंदावनला राहिलेल्या आहेत. वृंदावनला राहून भागवत कथेची पूर्ण तयारी करून त्या येथे आल्या. त्यानंतर त्यांनी कीर्तनास सुरुवात केली. सहा महिन्यांपूर्वी त्यांनी नर्मदा परिक्रमा केली, तेव्हापासून त्यांनी ठरवले होते की, मी घरी येणार नाही. आश्रमासाठी पंधरा वर्षांपूर्वी जागा घेतलेली होती. त्या दोन महिन्यांपासून येथे स्थायिक झाल्या होत्या. मी सकाळी शेतामध्ये असताना मला फोन आला की, इथे काहीतरी घडले आहे. इथे येऊन बघितले असता मला संगीताताई महाराज यांची हत्या झाल्याचे समजले, असे त्यांनी सांगितले.

# विद्युत तारेचा शॉक लागून तरूणाचा मृत्यू

## वीज वितरण कंपनीच्या अनास्थेचा बळी



**शंकरनगर (प्रतिनिधी)–** पायवाट रस्त्यावरील लोमकळत असलेल्या विद्युत तारेचा शॉक लागून एका २५ वर्षीय युवकाचा उपचाचारादरम्यान मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. वीज वितरण कंपनीच्या अनास्थेमुळे एका युवकाचा बळी गेला आहे.

दि. २० जून रोजी सकाळी साडे सहा वाजेच्या सुमारास येथील गणेश कोंडीबा डुबूकवाड (२५) हा आपल्या घरापासून काही अंतरावर असलेल्या व्यायामशाळेतून व्यायाम करून घरी परत येत होता. यावेळी बामणी उपकेंद्रालाकडे जाणाऱ्या विद्युत खांबावरील विजेचा तार शंकरनगरजवळ असलेल्या पायवाट रस्त्यावर लोमकळत होती. यावेळी गणेशला लोमकळत असलेल्या तारेचा शॉक लागला. या घटनेत तो गंभीर जखमी झाला होता. सदरील तरुणावर नांदेड येथील एका खासगी रुग्णालयात उपचार केले सुरू होते. अखेर दि. २८ जून रोजी पहाटे ५ वाजेच्या सुमारास उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला.

गणेश याच्या मृत्यू महावितरणच्या हलगर्जीपणामुळे झाला असल्याचे बोलले जात आहे. झालेल्या घटनेचा निषेध रामतीर्थ व शंकरनगर परिसरातील गावकऱ्यांच्यावतीने तीव्र विरोध करण्यात येत होता, परंतु सहायक पोलीस निरीक्षक विक्रम हराळे यांनी घटनास्थळी येऊन समस्त गावकऱ्यांना विनंती करून महावितरणावरच्या जो कोणी दोषी कर्मचारी आढळेल, त्यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा नोंद करण्यात येणार असल्याचे सांगितले. सपोनी यांच्यावर विश्वास ठेवून गावकऱ्यांनी गणेश याच्या पार्थिवावर अंतिमसंस्कार केले.




# मराठी महामोर्चाची ठाकरे बंधूंकडून जय्यत तयारी

## दोन्ही पक्षांनी विविध नेत्यांवर सोपविली जबाबदारी



**मुंबई (प्रतिनिधी)–** दि. ५ जुलै रोजी राज ठाकरे व उद्धव ठाकरे यांच्याकडून मराठी महामोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. या मोर्चाची जय्यत तयारी करण्यात येत असून महाराष्ट्र नवनिर्माण सेना व शिवसेना ठाकरे गटाच्या विविध नेत्यांवर जबाबदारी सोपविली आहे.

मुंबईतील गिरगाव चौपाटीवरून सकाळी दहा वाजता हिंदी सक्तीविरोधात ठाकरे बंधूंकडून एकत्रित महामोर्चाचं आयोजन करण्यात आलं आहे. उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे या दोघांनीही मराठी टिकावी यासाठी हिंदी सक्तीला विरोध करण्यासाठी जास्तीत जास्त संख्येने मोर्चात आपला सहभाग दर्शविण्याचे आवाहन केले आहे. अशातच हा मोर्चा यशस्वी करण्यासाठी ठाकरे गट आणि मनसेकडून तयारी सुरू झाल्याचे पाहायला मिळत आहे. ठाकरे गट आणि मनसेकडून आपापल्या पक्षातील काही नेत्यांवर या मोर्चाची जबाबदारी सोपवण्यात आल्याची माहिती समोर येत आहे. यामध्ये ठाकरेंच्या शिवसेनेकडून खासदार संजय राऊत आणि आमदार वरूण सरदेसाई यांच्यावर जबाबदारी असणार आहे. तर दुसरीकडे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडून मनसे नेते नितीन सरदेसाई, बाळा नांदगावकर आणि मुंबई शहराध्यक्ष संदीप देशपांडे यांच्यावर जबाबदारी टाकण्यात आली आहे.

# अमरावतीत पोलीस अधिकाऱ्याची हत्या



**अमरावती (प्रतिनिधी)–** अमरावतीमध्ये सहायक पोलीस उपनिरीक्षकाची हत्या करण्यात आली आहे. एका चारचाकी कारने दुचाकीस्वार पोलीस अधिकाऱ्याला उडवले. त्यानंतर त्यांच्या पोटावर, छातीवर धारदार शस्त्राने वार करून हल्लेखोर पसार झाले. मात्र काही तासांतच पोलिसांनी दोन आरोपींना अटक केली.

अमरावती पोलीस आयुक्तालय अंतर्गत वलगाव पोलीस स्टेशनला सहायक पोलीस उपनिरीक्षक अब्दुल कलाम अब्दुल कादर कार्यरत होते. हल्ल्यानंतर त्यांना नजीकच्या बेस्ट हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल केले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

सहायक पोलीस उपनिरीक्षक अब्दुल कलाम अब्दुल कादर हे दुचाकीवरून निघाले होते. मागून एका चारचाकीने त्यांना उडवले. ते दुचाकीवरून खाली पडताच हल्लेखोरांनी त्यांच्यावर सपासप वार केले. त्यांच्या छातीवर, पोटावर वार करून हल्लेखोरांनी तेथून पळ काढला होता.

त्यांच्यावरील हल्ल्याचे वृत्त समजताच घटनास्थळी अमरावती पोलीस आयुक्त अरविंद चावरिया दाखल झाले आहेत. फरार हल्लेखोरांना शोधण्यासाठी पोलिसांनी लगोलग दोन पथके रवाना केली. काही तासांतच पोलिसांनी दोन आरोपींना बेड्या ठोकल्या.

# १८ लाखांचा गुटखा जप्त, एफडीएची कारवाई



**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील अन्न व औषध प्रशासन विभागाने शहरातील देगलूर नाका भागात कारवाई करून राज्य सरकारने बंदी घातलेला आणि शरीराला अपायकारक असलेला १६ लाख २८ हजार किंमतीचा प्रतिबंधित अन्न पदार्थाचा साठा जप्त केला आहे. या कारवाईसाठी इतवारा पोलिसांनीही एफडीडीएला मदत केली.

गुरुवार, दि. २६ जून रोजी सहायक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन कार्यालयास मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे सहायक आयुक्त संजय चट्टे व सहायक आयुक्त राम भरकड यांच्या मार्गदर्शनाखाली अन्न सुरक्षा अधिकारी संतोष कनकावाड, ऋषिकेश मरेवार, अनिकेत भिसे, अरूण तम्मडवार तसेच प्रशिक्षणार्थी अन्न सुरक्षा अधिकारी अविनाश गिरी, शिल्पा श्रीरामे, अमृता दुधाटे, नमुना सहायक बालाजी सोनटक्के व पोलिस स्टेशन इतवाराचे अंमलदार हरप्रीतसिंग सुखई यांचे पथकाने मे. डायमंड ट्रेडर्स, अमेर फंक्शन हॉलजवळ, देगलूर नाका, नांदेड या पेढीची तपासणी केली असता, तपासणीवेळी पेढीमध्ये सयद मुबीन सयद गनी (वय ५१) व अजमोद्दिन अब्दुल हमीद (वय ४०) या व्यक्ती पेढीमध्ये हजर होते. पेढीच्या तपासणीमध्ये राजनिवास सुगंधीत पानमसाला, विमल पानमसाला, डायरेक्टर स्पेशल पानमसाला, एएए पानमसाला, मुसाफीर पानमसाला, आरएमडी पानमसाला, रजनीगंधा पानमसाला, सिग्नेचर पानमसाला, सितार गुटखा, विविध प्रकारचे सुंगधीत तंबाखू इत्यादी प्रतिबंधित अन्न पदार्थाचा एकूण १६ लाख २८ हजार ४९ रूपयांचा साठा जप्त करण्यात आलेला आहे. जप्त करण्यात आलेला प्रतिबंधित अन्न पदार्थाचा साठा पोलीस स्टेशन इतवारा, नांदेड यांच्या ताब्यात देण्यात येऊन संबंधित हजर व्यक्ती सयद मुबीन सयद गनी (वय ५१) व अजमोदिदन अब्दुल हमीद (वय ४०) यांचेविरूध्द अन्न सुरक्षा अधिकारी संतोष कनकावाड यांनी अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ व भारतीय न्यायसंहितेच्या विविध कलमानुसार फिर्याद दाखल केली आहे. कारवाईवेळी पोलीस निरीक्षक रणजीत भोईटे यांची उपस्थिती होती.

# भंगार उचलण्याच्या कारणावरून शिखाची वाडी शिवारात खून

## मुदखेड तालुक्यातील घटना




**मुदखेड (प्रतिनिधी)–** तालुक्यातील मौजे शिखाची वाडी शिवारातील क्रेशरवर भंगार उचलून घेत असल्याने झालेल्या हाणामारीत उपचारादरम्यान एकाचा खून झाला आहे. याप्रकरणी अज्ञात चार-पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शिखाची वाडी शिवारात गिट्टी क्रेशरजवळ शनिवारी मयत जोगिंदरसिंघ जगवीरसिंघ टाक (३३), रा. रमा माता आंबेडकर नगर, शेख सादिक शेख भोले पाशा (२६) रा. निजामबाद राज्य तेलंगणा या दोघांना भंगार उचलून घेत असताना अज्ञात अनोळखी चार ते पाच जणांनी लाकडाने तसेच लोखंडी पाईपने मारहाण करून गंभीर जखमी केले होते.

गंभीर जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते, उपचारादरम्यान जोगिंदरसिंघ जगवीरसिंघ टाक याचा मृत्यू झाला. शेख सादिक यांच्या फिर्यादीवरून आरोपींनी मयतास मारहाण केल्यानेच खून झाला आहे. याप्रकरणी पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक बी.आर. कांबळे हे करीत आहेत.

# मास्तर तुम्ही सुद्धा चुकलात..!

कथा



सांगली जिल्ह्यातील आटपाडी येथील बारावी विज्ञान शाखेत नुकताच साधनाने प्रवेश घेतला होता. वडील नेलकरंजी गावात खाजगी शाळेत शिक्षक होते. साधनाला दहावीत ८० टक्केपेक्षा अधिक गुण होते. साधनाने विज्ञान शाखेत प्रवेश घेतला. मनात डॉक्टर होण्याच स्वप्न घेऊन तिने अभ्यासाला सुरुवात केली. पाहता पाहता अकरावी उत्तीर्ण होऊन तिने बारावी वर्गात प्रवेश घेतला. एका मध्यमवर्गीय कुटुंबातील शिक्षकाची मुलगी असलेल्या साधनाला डॉक्टर व्हायचे होते. त्या दृष्टीने तिची वाटचाल सुरू होती. स्वतः च्या व आई-वडिलांच्या स्वप्नांना सत्यात उतरवण्यासाठी ती नेमकीच अभ्यासाला लागली होती... पण नियतीला काही दुसरेच मंजूर होते. नेमकच बारावी वर्गात प्रवेश घेतल्यानंतर महाविद्यालयांतर्गत वा क्लासअंतर्गत चाचणी परीक्षेत तिला कमी गुण मिळाले.

मुलीला कमी गुण आल्याचे पाहताच शिक्षक असलेल्या धोंडीराम भगवान भोसले या तिच्या वडिलांनी तिला चाचणी परीक्षेत कमी गुण कसे काय पडले म्हणून धारेवर धरले .मुलीला चाचणी परीक्षेत कमी गुण मिळाल्यामुळे शिक्षक असलेले वडील धोंडीराम भोसले मुलीवर प्रचंड संतापले. एवढ्या सगळ्या सेवा सुविधा असून चाचणी परीक्षेत एवढेच गुण का ..?म्हणून त्यांनी घरात आकार तांडव सुरू केले. पत्नीच्या समोर व घरातील इतर सदस्यांच्या समोर त्यांनी साधनावर प्रचंड राग काढला. शब्दाने शब्द वाढत गेला. बोलण्याच्या ओघात मुलगी साधनाने वडिलांना त्यांच्या दहावी व बारावीच्या कमी गुणाची आठवण करून दिली. मग काय वडील धोंडीराम भोसले चा पार अधिकच चढला. मुलीचे शब्द त्यांना प्रचंड झोंबले राग अनावर झाला. रागाच्या भरात त्यांनी जात्याच्या लाकडी खुंट्याने मुलगी साधनाच्या डोक्यावर भराभर वार केले त्यात ती जखमी झाली. बेशुद्ध पडली. तिला तात्काळ दवाखान्यात नेले, पण प्रयत्न असफल झाले.

जन्मदात्या पित्याच्या मारामुळे मुलगी गतप्राण झाली. मुलीचा अंत्यविधी झाल्यानंतर मुलीच्या आईने पो-लीस स्टेशन गाठले व झालेला सर्व प्रकार कथन केला. पोलिसांनी धोंडीराम भोसले यांना पकडून त्यांच्यावर गुन्हा दाखल केला व त्यांना लॉकअप मध्ये टाकले अशाप्रकारे एका शिक्षक असणाऱ्या पित्याच्या बेजबाबदारपणामुळे अडमुठेपणामुळे अति महत्वकांक्षामुळे अविचारामुळे डॉक्टर होण्याचे स्वप्न बाळगणाऱ्या कन्येला हाकनाक जीव गमवावा लागला. दुसऱ्या बाजूला पोटचा गोळा गेल्याचे दुःख अनावर झाल्यामुळे साधनाच्या आईने आपल्या पतीविरोधात पोलीससात तक्रार दाखल केली, त्या माऊलीवर दुःखाचा दुहेरी डोंगर कोसळला. एका सोन्यासारख्या गुणी पोरीचा जीव गेल्याचे दुःख तर दुसऱ्या बाजूला नवऱ्याच्या हेकाडीपणामुळे मुलगी जीवानिशी गेल्याची दुःख म्हणून तिने पतीच्या विरोधामध्ये गुन्हा नोंदवायचा ठरवले. परिणामी पती तुरुंगात गेला. पाह-ता पाहता हसऱ्या खेळणाऱ्या घराचे घरपण हरवून गेले. दुःखाचा दुहेरी मार बसल्यामुळे त्या माऊलीच्या संसारावर दुःखाचे आभाळ कोसळले. या घटनेचा तर्कशुद्ध यतार्थ वास्तविक मानसशास्त्रीय व व्यवहारिक दृष्टिकोनातून विचार करता असे लक्षात येते की, बहुतेक समाज हा भोगवादी चंगळवादी दिखाऊपणात रममान झाला आहे...म्हणून येथे प्रत्येक पालक आपल्या पाल्याला डॉक्टर इंजिनियर करून भरभरून पैसे कमवण्याचे स्वप्न पहात आहेत. मोठे पॅकेज, मोठी नोकरी, मोठी गाडी, मोठा बंगला, भरपूर पैसा, भोग विलास ऐशो आराम, मान मरतंब सत्ता संपत्तीचे स्वप्न साकार करण्यासाठी घाण्याच्या बैलाला झुंपावे तसे डॉक्टर इंजिनिअरच्या दावणीला मुलांना जुंपले जात आहे. त्याच्या क्षमतेचा, बुद्धिमत्तेचा, कुवतीचा कसलाही विचार न करता गधा व घोड्याची शर्यत लावली जाते आहे. जो मागे पडतो त्याला गधा समजून वारंवार सुचकारले जाते. धोपटले जाते. त्याच्या कमीपणाची जाणीव मागासलेपणाची जाणीव त्याला वारंवार करून दिली जाते. तू स्पर्धेत टिकत नाहीस. तू टिकला नाहीस तर तुझं जगणं व्यर्थ आहे. तुझं जीवन निरर्थक आहे तू कोणत्याही कामाचा नाहीस.. असे वारंवार सुनावले जाते. परिणामी अत्यंत साधारण बुद्धिमत्तेचे व सुमार बुद्धिमत्तेचे मुलं-मुली आई-वडिलांच्या स्वप्नांना म्हणा, की अहंकारानं म्हणा, की प्रतिष्ठेला म्हणा, हेकाडीपणाला सिद्ध करण्यासाठी जीवाच्या आकांताने राब राब राबवत आहेत. ढोर मेहनत करत आहेत. पाच दहा टक्के विद्यार्थी यात कमी अधिक यशस्वी होतात, पण बहुतेक विद्यार्थी पालकांच्या अहंकारासाठी रिपीट करतात. तिसऱ्यांदा परीक्षा देतात, चौथ्यांदा नीट ची परीक्षा देतात. जेईईची तयारी करून स्वतःला अहोरात्र अभ्यासात, ट्युशनमध्ये, होमवर्क, क्लासवर्क, चाचणी परीक्षा, ऑनलाईन, ऑफलाईन इत्यादीमध्ये गाढून घेतात. मात्र हे सर्व त्याच्या क्षमतेपेक्षा अधिक असल्यामुळे अनेक जण खचून जातात. डिप्रेशनमध्ये जातात. नर्वस होतात. स्वतःला पतीत समजतात. हीन दीन समजतात. मंदबुद्धी समजतात. तनाने मनाने खचतात. अशावेळी त्यांना सम जून न घेतल्यास अशी मुलं नको त्या मार्गाने आपला जीवन प्रवास संपवतात. मग अशा विद्यार्थ्याकडून किती अपेक्षा ठेवायची त्यांना किती संधी द्यायची व त्यांना कधी वास्तविकतेची जाणीव करून योग्य वाटेवर आणायचे याचा विचार पालकांनी करायलाच हवा. अन्यथा बाबा भी गेला व दशम्या भी गेल्या अशी वेळ येऊ शकते.

तात्पर्य आपल्या मुलांना सुख सुविधा निर्माण करून द्या, त्यांच्यात संघर्षाची हिंमत निर्माण करा. त्याला मोटिवेट करा, त्याला मानसिक भावनिक बळ द्या. पण हे सर्व करत असताना प्रत्यक्ष त्याच्या कुवतीचा विचार करून, त्याच्या क्षमतेचा विचार करून, त्याच्याकडून माफक अपेक्षा ठेवा. कारण परमेश्वराने प्रत्येकाला एकमेवाद्वितीय बनवला आहे, म्हणून विनाकारण तुलना करून दुःख पदरामध्ये पाडून घेऊ नका. स्वतःला, मुलाला ,कुटुंबाला, दुःखात ढकलू नका. आपलं मूल म्हणजे आपलं जग असतं. आपण त्याचं सर्वस्व असतो तर तो आपलं सर्वस्व असतो, म्हणून केवळ भौतिक लालसेपोटी हव्यासापोटी अहंकारापोटी प्रतिष्ठेपोटी अवास्तव स्वप्नापोटी सत्य नाकारू नका. वास्तविकतेपासून पळू नका. त्याला जे जमतय जे झेपते जे आवडतंय त्यात करिअर करू द्या. असं म्हणतात ज्याचं पॅशन व प्रोफेशन एक असतं तो जीवनात यशस्वी होतो. आनंदी राहतो. समाधानी राहतो, म्हणून केवळ वर्तमान अहंकाराचा प्रतिष्ठेचा यशापयशाचा विचार करून तुमची स्वप्न मुलावर लादू नका. तुमच्या स्वप्ना-पाई त्याच्या स्वप्नांची माती करू नका. जीवन फार आगाद आहे जीवन फार गुड आहे. येथे जन्माला येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला स्वतःचं प्रारब्ध आहे. नशीब आहे, म्हणून केवळ डॉक्टर इंजिनियर म्हणजे सर्वस्व नव्हे, तर जीवनाच्या इतर क्षेत्रातही आपली ओळख नाव प्रतिष्ठा मान मरातब निर्माण करता येतो हे विसरू नका. जसे की ए.पी.जे. अब्दुल कलाम यांना सैन्यांमध्ये भरती व्हावयाचे होते, पण त्यांची उंची कमी असल्यामुळे ते सैन्यात भरती होऊ शकले नाहीत.. पण पुढे ते शास्त्रज्ञ झाले. मिसाईल मॅन झाले, देशाचे राष्ट्रपती झाले.

देशाच्या तिन्ही सैन्यदलाचे प्रमुख झाले. अशाच प्रकारे अण्णा हजारे केवळ दहावीपर्यंत शिकले, त्यांनी देशसेवा केली. सैन्यात नोकरी केली. निवृत्तीनंतर ते महान समाज सुधारक म्हणून नावारूपाला आले. धीरूभाई अंबानी केवळ दहावीपर्यंत शिकले. पुढे पेट्रोल पंपावर नोकरी राहिले, काही काळ सायकलवर कपडे बांधून गावागावात कपडे विकले. नंतर ते उद्योग क्षेत्रात उतरले व पेट्रोकेमिकल कंपनीचे मालक झाले कापड उद्योगांमध्ये स्वतःचे अस्तित्व निर्माण केले. अशाच पद्धतीने सचिन तेंडुलकर दहावी नापास झाला, पण पुढे जगविख्यात क्रिकेटपटू म्हणून तो नावारुपाला आला. सातवीला दोन वेळा नापास झालेले व दहावीला पास न झालेले रवींद्रनाथ टागोर पुढे गीतांजली महाकाव्याचे कवी म्हणून जगामध्ये नावारूपाला आले, त्यांना नोबेल पारितोषिक मिळाले. अशाप्रकारे महाराष्ट्रातही रिक्षा चालवणारा व्यक्ती सी.एम. झाला तर गुजरातचा चहा विकणारा व्यक्ती पी.एम. झाला सांगायचं तात्पर्य प्रत्येक व्यक्ती जन्माला येताना दोन हात घेऊन जन्माला येतो. तसेच स्वतःचे भाग्य घेऊन जन्माला येतो.

काही लोक प्रयत्नाने परिश्रमाने मेहनतीने भाग्य बदलण्याची ताकद ठेवतात.. म्हणून ते जग बदलतात. स्वतःला सिद्ध करतात. म्हणून आपण हताश न होता निराश न होता जीवनात कोणत्याही क्षेत्रात उतरा, स्वतः ला सिद्ध करा, जग तुमच्या पायावर लोळण घेतल्याशिवाय राहणार नाही. शेवटी एक सांगावेसे वाटते की, देशाला चालवण्यासाठी केवळ डॉक्टर व इंजिनियर्स यांचीच गरज नाही तर शेतात कष्ट करणारा बळीराजा, सीमेवर पहारा देणारा सैनिक, शाळेमध्ये रमणारे शिक्षक, खेळाच्या मैदानावरील खेळाडू, समाजाचे प्रबोधन करणारे समाजसेवक, राज्यकर्ते, प्रशासक सर्वच देशासाठी महत्त्वाचे असतात, म्हणून केवळ डॉक्टर व इंजिनियरच्या मागे लागून स्वतःचे व मुलाचे विश्व बरबाद करण्यापेक्षा आपली क्षमता ओळखा, आपल्या मर्यादा ओळखा व जीवनाच्या ज्या क्षेत्रामध्ये आवड आहे त्या क्षेत्रात उंच भरारी घ्या. स्वतःला सिद्ध करा. आई-वडील व गावाचे नाव मोठं करा ..हीच सर्वांना शुभेच्छा .पण दुर्दैव याचं वाटतं की स्वतः शिक्षकी पेशामध्ये असून धोंडीराम भोसले गुरुजीं आपल्या मुलीला समजून घेऊन शकले नाहीत. केवळ तात्काळ गुणांचा विचार केला. कदाचित भविष्यात साधना नक्कीच मेडिकलला लागली असती.. पण तेवढा संयम, धीर, ते बाळगू शकले नाहीत, म्हणून वादाने वाद वाद वाढला, मुलीने त्यानंतर त्यांच्या दहावी व बारावीतील कमी गुणांची आठवण करून देताच त्यांचा संतापणावर झाला. शेवटी नको ते झाले पोटच्या गोळ्याला त्याने क्रोधाने झोडपलं, त्यात लेकीचा जीव गेला. शेवटी भोसले गुरुजींना जेलमध्ये जावे लागले. म्हणून म्हणतो वेळीच स्वतःला आवरा, सावरा, आपल्या मर्यादा ओळखा. संयम ठेवा. धैर्य ठेवा. येणाऱ्या काळात जीवनाच्या कोणत्या ना कोणत्या क्षेत्रात तुम्ही उत्तुंग भरारी घ्याल यात तीळमात्र शंका नाही .लेखक अजित दळवी यांचे काही वर्षांपूर्वी डॉक्टर तुम्हीसुद्धा हे नाटक रंगभूमीवर आले होते. त्यात डॉक्टरी पेशातील नैतिकतेवर प्रखर भाष्य केले होते ,त्यातून काही प्रश्न निर्माण केले होते. त्या अनुषंगाने मला इथे नम्रपणे म्हणावे वाटते मास्तर तुम्ही शिक्षण क्षेत्रात असूनही मुलाला समजून घ्यायला चुकलात. कमी पडलात म्हणून म्हणतो मास्तर तुम्ही सुद्धा चुकलात.

**-प्रा. डॉ. शशिकांत तोळमारे**
श्री योगानंद स्वामी कला महाविद्यालय
वसमत, जि. हिंगोली
मो. ९४२१०८८२६२

# मूल्यऱ्हासाच्या काळात वाचकाला अंतर्मुख करायला लावणारी कलाकृती : पसायधन




प्रत्येकाच्या आयुष्यात अनेक प्रेरक व प्रेरणादायी नायक असतात. आत्मचरित्र, कादंबरी, कथा, सिनेमा व रंगमंच यांच्या माध्यमातून व्यक्तीत घर करून बसलेले असतात. जन्मभर अतिशय जवळचे वाटतात. तेच नायक आपल्या बोलण्यातून, गप्पा-गोष्टीतून व अनुकरणातून आपसूकच व्यक्त होत असतात. प्रत्येकाच्या मनातील हळव्या कोपऱ्याला उजाळा देणारी ही साहित्यकृती आहे. ते काम काम विश्वाधार देशमुख यांनी केले आहे.

जवळ किंवा सहवासात असलेल्या सगळ्यांना सगळ्याचे मनं कळत नसतात. त्यांना त्यांच्या भावनांची कदरही करता येत नाही. कांही व्यक्ती आशा असतात सभोवताली जवळच्या व सहवासातल्या सगळ्यांची मनं कळतात व त्यांना त्यांच्या भावना समजतात. पण त्या अव्यक्त असतात. आपल्या सभोवताली असलेल्या सगळ्यांच्या सामुहिक भावना व मतांचा एकंदरीत सार म्हणजे पसायधन ही साहित्यकृती होय.

जे नितळ, निर्मळ, पारदर्शी व प्रवाही असते ते टिकावू असते. या गोष्टीचा बोध होणं काळाची गरज असते. जे आत ते बाहेर या गोष्टीचा प्रत्यय आपला चेहरा व आपली देहबोली यातून येतो. आज प्रत्येकाचं वागणं आणि बोलणं यातील अंतर झिरो असेल तर ते कर्तृत्व व व्यक्तीमत्व सर्वांसाठी प्रेरक व जवळचे वाटते.अशा अनेक व्यक्तीमत्वाचा परामर्श या साहित्य कृतीतून विश्वाधर देशमुख यांनी घेतलेला आहे. घेण्यासाठीही तेवढं पारद-र्शी जीवन असावं लागते. याचा प्रत्यय विश्वाधर देशमुख यांच्या अनोख्या प्रयोग व त्यामागे असलेल्या भावनेतून प्रत्ययास येते.

सुख आणि दुःख आपल्या जवळच आहेत. माध्यमांच्या विळख्यात आपण ते हरवून बसलो. आपल्यातील अस्थेला व आपल्या सामाजिक भावनेला आपली विवेकबुद्धी ओळखत नाही. आपल्या विवेक बुद्धीला माध्यमांच्या सहवासात निर्माण झालेल्या हाव व हव्यासाने खाऊन टाकले आहे. मनुष्य मोबाईलसारख्या माध्यमांच्या प्रलोभनी मृगजळामागे धावतो आहे. भाव भावना, संवेदना ,कदर, खातरदारी व नातेसंबंध या सगळ्या गोष्टी विसरून आत्ममग्न व आत्मप्रौढी मिरवणारा झालेला आहे. आशा मूल्यऱ्हासाच्या काळात व्यक्तीकल्याण व सामाजिक भान जोपासण्यासाठी आत्म परीक्षण करायला लावणारी 'पासायधन' ही साहित्यकृती खूप महत्वाची व जवळची वाटते.

सामाजिक गुंता वाढत आहे. शासन व्यवस्था, कुटुंब व्यवस्था,सामाजिक अस्था या सगळ्या गोष्टीवरील विश्वास ढळतो आहे. यामध्ये कारणीभूत घटक अनेक आहेत. पण अशा या काळात विद्यार्थी केंद्रस्थानी ठेवून लेखन करणे ही तारेवरची कसरत असते. पण लेखकांनी ते लिलया पेलले आहे.

काळाचे वास्तव भान ठेवत,वैज्ञानिक दृष्टिकोन जपणारे लेखकाचे लेखन महत्वाचे वाटते. आशा या दोलायमान काळात विश्वाधर देशमुख यांनी केलेले लेखन दिशादर्शक व काळाचे प्रतिनिधित्व करणारे आहे. 'पसायधन' ही लेखमाला संथ संवेदनपणे मानवाच्या अंतर्मनातील उत्क्रांत भावनेचा आरसा आहे.

एकत्वाच्या अनुभूतीतून सख्यत्व म्हणजे मैत्री ही लेखातील व्याख्या प्रत्येकाच्या आयुष्यातील कठीण परिस्थितीत धाव घेणारी जागा व मानसिक स्थैर्याचे एकमेव ठिकाण म्हणजे मैत्री असते अशी जाणीव करून देते.

'द ओल्ड मॅन अँड व सी' या कादंबरीतील सॅतियागो या जिद्दी वृद्ध माणसाची कथा अचाट आत्म विश्वास,चिकाटी, जिद्द व मनोधैर्य यासाठी वयाची कोणतीही अट नसते असा म तिथार्थ सांगते. तरूण वयात वृद्ध झालेल्या तरुणांना स्फुर्ती देते.

'कुसुमाग्रजांचा कोलंबस' हा लेख आपल्यातील सुप्त गुणांचा शोध घेण्यासाठी प्रवृत्त करते.'हमीद' या कथेच्या माध्यम ातून कौटुंबिक बंधातील नाजूक,हळवे प्रेम,समर्पण व त्याग या आदर्श गुणाची समाजास गरज आहे असा संदेश देते.

'लाल चिखलात नाचणारा आबा' या लेखात शेती, शेतकरी, शासन,समाज, कुटुंब आणि बंड या गोष्टीचा तपशीलवार परामर्श आलेला आहे. शेतकऱ्यांना मदती बरोबर मानसिक स्थैर्याची गरज आहे. शेतकऱ्यांच्या एकंदरीत अवस्थेचा हळवा संवेदन विदारक अवस्था मांडणारा लेख कुबीकीचे जगणे मांडतो.

करियरची निवड करायची की कर्तव्याची ? या अशा कठीण काळात वेळ,काळ, परिस्थिती व पैसा यापुढे जित्या-जागत्या संवेदनशील माणसांची वाटणी करण्याच्या अनेक घटना समाजात घडत आहेत. ती वाटणी कशी करायची? हा प्रश्न मनाला अंतर्मुख करायला लावतो. यासाठी सायकॉलॉजिकल अर्ग्युमेंटसची दीर्घ मालिका उभी करण्यासाठी भगवद्गीता सांगणाऱ्या कृष्णाचे तंत्रज्ञान ही काळाची गरज बनली आहे. पण ते ऐकायला व सम जून घ्यायला आधुनिक जगाकडे वेळ कोठे उरला आहे ? हा प्रश्न गंभीर बनतो आहे. असंख्य मराठी वाचकांच्या मनावर कायमचा ठसा उमटवलेले पण कालौघात विस्मृतीत गेलेले साहित्य, कला, सिनेमा,नाटक, नायक,व्यक्तीमत्त्व यावर आधारित विश्वाधार देशमुख यांनी केलेल्या चिंतनाची अनुभूती यामुळे वाचक अस्वस्थ होतो. पसायधन ही कलाकृती जवळची वाटायला लागते. मूल्यऱ्हासाच्या काळात वाचकाला अंतर्मुख करायला लावणारी ही कलाकृती आहे ,असं वाचक म्हणून मी या कलाकृतीकडे पाहतो.

**लेखसंग्रह : 'पसायधन'**
**लेखक-प्रा. विश्वाधार देशमुख**
**प्रकाशक : काव्याग्रह प्रकाशन,वासिम**
**मुखपृष्ठ व सजावट : प्रदीप खेतमर, पुणे**
**मूल्य- २०० रु.**

# सखा पांडुरंग..

पंढरी जायचे । दर्शन घ्यायचे ।
अभंग गायचे । मज सुद्धा ।।
सखा पांडुरंग । रखुमाई संग ।
बोलतो मृदंग । पांडुरंग ।।
भक्त गोळा झाले । पंढरीस आले ।
सान,थोर प्याले । भक्तिरस ।।
भक्तीचा सोहळा । आगळा वेगळा ।
शोभे हार गळा । तुळशीची ।।
हाती विणा टाळ । सोबतीला बाळ ।
माऊलीशी नाळ । जुळलेली ।।
बघ विठाबाई । आली माझी आई ।
तुज घाई घाई । न्याहाळण्या ।।
आईची साधना । शुद्ध आराधना ।
म्हणुनी कामना । पूर्ण कर ।।
येईल परत । हासत हासत ।
करावी मदत । याचसाठी ।।
अजू विठुराया । राहो तुझी छाया ।
नभागत माया । पुरवावी ।।

**-अजय रमेश चव्हाण**
तरनोळी
ता.दारव्हा, जि.यवतमाळ
मो.८८०५८३६२०७

# तू, आठवणीतला पाऊस!

तू आठवणीतला पाऊस
रोज नयनातुन झरतो
वेदनेच्या अत्तरकुपीत
का वेड्यासारखा बरसतो ?
एक झिम्माड अबोल थेंब
ओल्या पापणीतून ढळतो
आठवणींचा कल्लोळ ओला
काळजाला नव्याने छळतो ?
आजही तूझ्या आठवणीत
तो वा-याशी सलगी करतो
पुन्हा पुन्हा तुझ्याच ओढीने
एका भेटीसाठी तरसतो
चिंब ओला हळवा पाऊस
मृगनक्षत्रात बहरतो
विरहातील चातक पक्षी
इंद्रधनु होऊन झुरतो
तु आठवणीतला पाऊस
पाऊलखुणा ठेवून जातो
प्रीतगंधीत तुझ्या स्मृतींना
अलवार श्वासात माळतो
ती अवचित भेट आपली
आठवता आजही भुलतो
ऊबदार मिठीतला क्षण
बेधुंद कुंतली शहारतो

**-रुपाली वागरे/वैद्य**
स्वरुप निवास
भावसारचौक, मालेगाव रोड,एनांदेड
मो. ९८६०२७६२४१

# सांख्यिकी: आधुनिक भारताची दिशा ठरवणारे विज्ञान



२९ जून आधुनिक भारतीय संख्याशास्त्राचे जनक, इंडियन स्टॅटिस्टिकल इन्स्टिट्यूट (खडख) चे संस्थापक प्रो. प्रशांतचंद्र महालनोबिस यांचा जन्मदिवस. हा दिवस राष्ट्रीय सांख्यिकी दिन म्हणून साजरा केला जातो. त्यांच्या कार्याचा आणि आजच्या काळात आकडेवारीने व्यापलेल्या जगाचा आढावा घेणे आजच्या घडीला अत्यंत महत्त्वाचे आहे.

**प्रो. महालानोबिस यांचे योगदान:**

१९१२ मध्ये कोलकात्याच्या प्रेसिडेन्सी कॉलेजमधून भौतिकशास्त्रात पदवी घेतल्यानंतर इंग्लंडमध्ये शिक्षण घेत असताना त्यांना संख्याशास्त्राची गोडी लागली. यानंतर त्यांनी आपले संपूर्ण जीवन संख्याशास्त्राच्या अध्ययनअध्यापनासाठी वाहून घेतलं. भारतात परतल्यावर त्यांनी भारतातील विद्यापीठामध्ये संख्याशास्त्र विषय सुरु केला. त्यांच्या प्रयत्नाने आणि पुढाकाराने आपल्या देशात अल्पावधीतच जागतिक दर्जाचे काम सुरु झाले आणि अन्य देशांच्या तुलनेत भारत हा संख्याशास्त्र विषयात प्रगत झाला. महालानोबिस यांनी केवळ शिक्षण आणि संशोधनात नव्हे, तर शासकीय धोरणनिर्मितीतही आकडेवारीचे स्थान प्रस्थापित केले. त्यांनी स्थापलेली खडख संस्था आजही संख्याशास्त्र क्षेत्रात जागतिक मान्यता प्राप्त आहे.'महालानोबिस अंतर' या त्यांच्या संशोधनामुळे विविध क्षेत्रात गटांमधील अंतर मोजण्याची प्रभावी पद्धत मिळाली. हवामानशास्त्र, पर्जन्यमान, पूरनियंत्रण, धरण बांधणी यामध्ये आकडेवारीचा वापर त्यांनी करून दाखवला.'राष्ट्रीय नमुना पाहणी संघटना' (छडडज) आणि 'केंद्रीय संख्याशास्त्रीय संघटना' (उडज) यांच्या स्थापनेमागे त्यांचा मोलाचा वाटा होता.भारतातील पहिला संगणक १९५६ मध्ये खडख मध्ये बसवण्याचे श्रेयही त्यांच्याकडे जाते.

**आजचा संदर्भ: कृत्रिम बुद्धिमत्ता, बिग डेटा आणि संख्याशास्त्र**

आज आपण कृत्रिम बुद्धिमत्ता (ख), मशिन लर्निंग, बिग डेटा या शब्दांनी परिचित झालो आहोत. पण यामागील मुळ संकल्पना म्हणजे आकडेवारी आणि संख्याशास्त्रच !आरोग्यसेवा, औषधांची परिणामकारकता, अर्थव्यवस्था, हवामान अंदाज, कृषी, जलव्यवस्थापन, शिक्षण आणि अगदी इंटरनेटवरील वर्तन (युजर बिहेवियर) समजून घेणे हे सर्व आकडेवारीशिवाय अशक्य आहे.कृत्रिम बुद्धिमत्ता (ख) व डेटा सायन्समध्ये संख्याशास्त्राच्या संकल्पना जसे की प्रायिकता, रिग्रेशन, सॅम्पलिंग, क्लस्टरिंग यांचा मोठा वापर होतो.धोरण आखताना सरकार किंवा कंपन्या डेटा ड्रिव्हन डिसिजन घेतात त्यामागे आहे संख्याशास्त्र.

**सांख्यिकीची वाढती गरज व भविष्य**

केंद्रीय लोकसेवा आयोग (णझडउ) अंतर्गत इंडियन स्टॅटिस्टिकल सर्विसेस (खडड) ही परीक्षा घेतली जाते. उद्योग, बँकिंग, विमा, माहिती तंत्रज्ञान (खढ), उत्पादन, वाहतूक, पर्यावरण, जैवविज्ञान इत्यादी क्षेत्रात डेटा ॲनालिस्ट्स आणि स्टॅटिस्टिशियन (संख्याशास्त्रज्ञ )ची गरज झपाट्याने वाढते आहे.संख्याशास्त्र हे फक्त सूत्रांचे किंवा आकड्यांचे नव्हे, तर अचूक निर्णय घेण्याचे विज्ञान आहे.

**तरुणांसाठी संदेश**

हल्ली अनेक युवा आकडेवारीकडे कोरडा विषय म्हणून पाहतात. पण हेच शास्त्र जीवनाच्या प्रत्येक क्षेत्राशी निगडीत आहे. संख्याशास्त्र स्वीकारा कारण भविष्य हे डेटा आणि बुद्धिमत्तेचे आहे. प्रो. महालानोबिस यांनी दाखवलेला मार्ग आज भारताला आत्मनिर्भर आणि वैज्ञानिक दृष्ट्या सक्षम बनवतो आहे. आजचा 'राष्ट्रीय सांख्यिकी दिन' हा केवळ गौरवाचा नाही, तर नव्या संधींचा विचार करण्याचा दिवस आहे. राष्ट्रीय सांख्यिकी दिनाच्या सर्वांना शुभेच्छा !

**-प्रा. विजय कोष्टी,**
कवठे महांकाळ (जि. सांगली).

# सन्मान द्या, सन्मान घ्या!

आपण इतरांना सन्मान दिला तरच आपल्यालाही सन्मान प्राप्त होतो. परस्पर आदर आणि मान सन्मानाच्या नात्यामुळे समाजात एकतेची भावना निर्माण होते. हाच संदेश आपल्या कार्यात, संवादात, आणि नात्यांमध्ये रूजवला तर समाज अधिक सुसंवादी बनेल. आदर हा केवळ वयानुसार न करता, प्रत्येक व्यक्तीच्या विचारांप्रती, कार्यप्रती असावा. मान-सन्मान दिला की व्यक्ती आत्मविश्वासाने काम करतो व समाजात सकारा-त्मक योगदान देतो. यामुळे समाजात विरोध, भांडणं किंवा दुजाभाव कमी होतो त्यामुळेच विविधता असलेल्या समाजात ही एकतेचे बंध म जबूत होतात. आदर आणि सन्मान या मूल्यांमुळे समाजात बंधुभाव, सहिष्णुता आणि एकत्रितपणा वाढतो.

आदर आणि मान-सन्मानाच्या नात्याम ुळे समाजात एकतेची भावना निर्माण होते. ही गोष्ट अत्यंत महत्त्वाची आहे. जेव्हा व्यक्ती एकमेकांचा आदर करतात, त्यांचा सन्मान करतात, तेव्हा त्या नात्यांमध्ये विश्वास आणि आपुलकी निर्माण होते. हा विश्वास समाजातील विविध स्तरांमध्ये सहकार्य आणि समतेची भावना निर्माण करतो. जेव्हा व्यक्ती एकमेकांचा आदर करतो, एकमेकांना सन्मानाने वागवतात, तेव्हा समाजात परस्पर विश्वास, समजूत आणि सहकार्य वाढते. यामुळे कोणताही गट, समाज किंवा राष्ट्र अधिक एकजूट होऊन प्रगतीकडे वाटचाल करू शकतो.

आदर आणि मान-सन्मान हे प्रत्येक माणसाच्या आत्मसन्मानाशी जोडलेले असते. जेव्हा लोक एकमेकांचा सन्मान करतात, त्यांच्या मतांना, भावना आणि अस्तित्वाला मान देतात, तेव्हा समाजात परस्पर विश्वास वाढतो द्वेष, हेवेदावे कमी होतात. लोक एकमेकांच्या सहकार्याने काम करतात. एकोप्याचे वातावरण तयार होते. संघर्ष टाळता येतात आणि विकासाचा मार्ग मोकळा होतो. यामुळे समाज एकत्र येतो, सामूहिक निर्णय घेता येतात आणि सर्वांगीण प्रगतीस चालना मि ळते. आदर हे नात्यांना मजबूत करतं, आणि मजबूत नाती समाजात एकतेचं बीज पेरतं. जेव्हा एखाद्या व्यक्तीला आदराने वागवले जाते, तेव्हा त्याला वाटते की तो समाजात महत्त्वाचा आहे, त्याचे अस्तित्व मूल्यवान आहे. याउलट, जेव्हा अपमान किंवा दुर्लक्ष होते, तेव्हा आत्मसन्मानाला ठेच लागते. म्हणूनच कोणत्याही नातेसंबंधात, व्यावसायिक किंवा वैयक्तिक क्षेत्रात, इतरांचा आदर राखणे हे अत्यंत आवश्यक ठरते.

आदर म्हणजे दुसऱ्याच्या भावना, मतं, वय, अनुभव यांचा योग्य विचार व स्वीकार करणे. जेव्हा समाजातील प्रत्येक घटकाला योग्य आदर व मान मिळतो, तेव्हा विविधतेतून एकता निर्माण होते. एकमेकांबद्दलचा आदर द्वेष, मतभेद आणि तणाव कमी करतो, व समृद्ध, सुसंस्कृत समाजाची उभारणी करतो. आपण इतरांना सन्मान दिला तरच आपल्यालाही सन्मान प्राप्त होतो ही एक जीवनातील अत्यंत महत्त्वाची शिकवण आहे. जेव्हा आपण इतरांच्या विचारांना, भावनांना आणि अस्तित्वाला मान देतो, तेव्हा आपलं व्यक्तिमत्त्वही अधिक उंचावलेलं दिसतं, आणि लोकही आपल्याकडे आदराने पाहू लागतात.

**-श्रीकांत संभाजी मगर**
नांदेड.
मो. ९६८९११७१६९

## Annexure I — Form A

## Balance Sheet of GODAVARI URBAN CO-OPERATIVE BANK LTD. VAZIRABAD, NANDED

### FORM OF BALANCE AS ON 31ST MARCH, 2025

| Particulars | Schedule | As on 31-3-2025 (Current Year) | As on 31-3-2024 (Previous Year) |
|---|---|---|---|
| **CAPITAL AND LIABILITIES** | | | |
| Capital | 1 | 14912900.00 | 13547300.00 |
| Reserves and Surplus | 2 | 53059472.51 | 51226626.95 |
| Deposits | 3 | 340845351.00 | 321208951.58 |
| Borrowings | 4 | 0.00 | 0.00 |
| Other liabilities and provisions | 5 | 53155862.09 | 56208111.09 |
| **Total Capital And Liabilities** | | **461973585.60** | **442190989.62** |
| **ASSETS** | | | |
| Cash | 6 | 4398618.00 | 6057576.00 |
| and Balances with Reserve Bank of India | | 0.00 | 0.00 |
| Balance with banks and money at call and short notice | 7 | 53089994.94 | 63537230.55 |
| Investments | 8 | 196510500.05 | 196510500.05 |
| Advances | 9 | 172529246.02 | 139401286.76 |
| Fixed Assets | 10 | 19425797.25 | 19327297.25 |
| Other Assets | 11 | 16019429.34 | 17357099.01 |
| **Total Assets** | | **461973585.60** | **442190989.62** |
| Contingent liabilities | 12 | 2808871.18 | 2773607.18 |

## Annexure I — Form B

## Profit & Loss A/c of GODAVARI URBAN CO-OPERATIVE BANK LTD. VAZIRABAD, NANDED

### Form of Profit and Loss Account for the year ended on 31st March, 2025

| | Particulars | Schedule | As on 31-3-2025 (Current Year) | As on 31-3-2024 (Previous Year) |
|---|---|---|---|---|
| I. | **Income** | | | |
| | Interest earned | 13 | 42792743.46 | 39642946.33 |
| | Other income | 14 | 2982257.40 | 2779225.23 |
| | **Total Income** | | **45775000.86** | **42422171.56** |
| II. | **Expenditure** | | | |
| | Interest expended | 15 | 35996224.00 | 33822143.00 |
| | Operating expenses | 16 | 7684533.30 | 7197375.52 |
| | Provisions and contingencies | | 778657.00 | 143824.00 |
| | **Total Expenditure** | | **44459414.30** | **41163342.52** |
| III. | **Profit/Loss** | | | |
| | Net profit/loss(-) for the year | | 1315586.56 | 1258829.04 |
| | Profit/Loss(-) brought forward | | 0.00 | 0.00 |
| | **Total Profit / Loss** | | **1315586.56** | **1258829.04** |
| IV. | **Appropriations** | | | |
| | Transfer to Statutory Reserves | | **0.00** | **300000.00** |
| | Transfer to Other Reserves | | **0.00** | **215935.04** |
| | Transfer to Proposed Dividend 5% | | **0.00** | **631894.00** |
| | Transfer to Government (Income Tax) | | **0.00** | **111000.00** |
| | **Balance carried over to Balance Sheet** | | **0.00** | **0.00** |
| | **Total** | | **0.00** | **1258829.04** |

**Proposed Dividend accounting year for 2024-2025 subject to Annual General Body Meeting approval**

| Chairman | Director | Director | C.E.O. | Manager |
|---|---|---|---|---|
| **Dr. R. D. Deshmukh** | **Dr. S. M. Tale** | **Shri. M.A. Waykos** | **Ms. Kanchan R. Parihar** | **Mr. Ram D. Kalyankar** |

Date : 23/06/2025
Place : Nanded

For : **M/S SPML & Associates**
Chartered Accountant
FRN No. 136549W
**C. A. Prakash Gattani**
(Partner)

Membership No. 039757
Audit Panel No. 17342
UDIN : 25039757BMILJT2165

### Schedule 1 - Capital

| | | As on 31-3-2025 (Current Year) | As on 31-3-2024 (Previous Year) |
|---|---|---|---|
| I. | **For Nationalised Banks** | | |
| | Capital (Fully owned by Central Government) | 0.00 | 0.00 |
| | | **0.00** | **0.00** |
| II. | **For Banks incorporated outside India** | | |
| | **Capital** | | |
| | (i) The amount brought in by banks by way of start-up capital as prescribed by RBI should be shown under this head | 0.00 | 0.00 |
| | (ii) Amount of deposit kept with the RBI under Section 11(12) of the Banking Regulation Act, 1949 | 0.00 | 0.00 |
| | **Total** | **0.00** | **0.00** |
| III. | **For Other Banks** | | |
| | Authorised Capital (14903 shares of Rs. 1000 each) | **20000000.00** | **20000000.00** |
| | Issued Capital ( shares of Rs. each) | 14903000.00 | 13535000.00 |
| | Subscribed Capital (Nominal member shares of Rs. 100 each) | 0.00 | 0.00 |
| | Called-up Capital (_______shares of Rs. 1000 each) | 9900.00 | 12300.00 |
| | Less: Calls unpaid | | |
| | Add: Forfeited shares | | |
| | **Total Capital** | **14912900.00** | **13547300.00** |

### Schedule 2 - Reserves and Surplus

| | | As on 31-3-2025 | As on 31-3-2024 |
|---|---|---|---|
| I. | **Statutory Reserves** | | |
| | Opening Balance | 13210228.26 | 12571140.26 |
| | Additions During the year | 317000.00 | 639088.00 |
| | Deductions during the year | | 0.00 |
| | | **13527228.26** | **13210228.26** |
| II. | **Capital Reserves** | | |
| | Opening Balance | 36757569.65 | 35843498.16 |
| | Additions during the year | 1459088.04 | 914071.49 |
| | Deductions during the year | 0.00 | 0.00 |
| | | **38216657.69** | **36757569.65** |
| III. | **Share Premium** | | |
| | Opening Balance | 0.00 | 0.00 |
| | Additions during the year | | |
| | Deductions during the year | | |
| | | **0.00** | **0.00** |
| IV. | **Revenue and Other Reserves** | | |
| | Opening Balance | 0.00 | 0.00 |
| | Additions during the year | 0.00 | 0.00 |
| | Deductions during the year | 0.00 | 0.00 |
| | | **0.00** | **0.00** |
| V. | **Balance in Profit and Loss Account** | **1315586.56** | **1258829.04** |
| | **Total (I, II, III and V)** | **53059472.51** | **51226626.95** |

### Schedule 3 - Deposits

| | | As on 31-3-2025 | As on 31-3-2024 |
|---|---|---|---|
| A.I. | **Demand deposits** | | |
| | (i) From banks | | |
| | (ii) From others | 4323174.42 | 5320311.32 |
| II. | **Savings Bank Deposits** | **61973261.58** | **55206332.26** |
| III. | **Term Deposits** | | |
| | (i) From banks | 0.00 | 0.00 |
| | (ii) From others | 274548915.00 | 260682308.00 |
| | **Total (I,II and III)** | **340845351.00** | **321208951.58** |
| B. | (i) Deposits of branches in India | 0.00 | 0.00 |
| | (ii) Deposits of branches outside India | 0.00 | 0.00 |
| | **Total** | **0.00** | **0.00** |

### Schedule 4- Borrowings

| | | As on 31-3-2025 | As on 31-3-2024 |
|---|---|---|---|
| I. | **Borrowings in India** | | |
| | (a) Reserve Bank of India | 0.00 | 0.00 |
| | (b) Other banks | 0.00 | 0.00 |
| | (c) Other institutions and agencies | 0.00 | 0.00 |
| II. | **Borrowings outside India** | 0.00 | 0.00 |
| | **Total (I and II) Borrowing** | **0.00** | **0.00** |

### Schedule 5- Other Liabilities and Provisions

| | | As on 31-3-2025 | As on 31-3-2024 |
|---|---|---|---|
| I. | Bills payable | 0.00 | 0.00 |
| II. | Inter-office adjustment (net) | 0.00 | 0.00 |
| III. | Interest accrued | 7732637.50 | 9672971.50 |
| IV. | Others (including provisions) | 45423224.59 | 46535139.59 |
| | **Total Other Liabilities & Provisions** | **53155862.09** | **56208111.09** |

### Schedule 6- Cash and Balances with Reserve Bank of India

| | | As on 31-3-2025 | As on 31-3-2024 |
|---|---|---|---|
| I. | **Cash in hand (including foreign currency notes)** | **4398618.00** | **6057576.00** |
| II. | **Balances with Reserve Bank of India** | **0.00** | **0.00** |
| | (a) in Current Account | 0.00 | 0.00 |
| | (b) in Other Accounts | 0.00 | 0.00 |
| | **Total (I and II)** | **4398618.00** | **6057576.00** |

### Schedule 7- Balances with Banks and Money at Call and Short Notice

| | | As on 31-3-2025 | As on 31-3-2024 |
|---|---|---|---|
| I. | **In India** | | |
| | **(i) Balances with banks** | | |
| | (a) in Current Accounts | 24998905.94 | 25570477.55 |
| | (b) in Other Deposit Accounts | 28091089.00 | 37966753.00 |
| | **(ii) Money at call and short notice** | | |
| | (a) with banks | 0.00 | 0.00 |
| | (b) with other institutions | 0.00 | 0.00 |
| | **Total (i and ii)** | **53089994.94** | **63537230.55** |
| II. | **Outside India** | | |
| | (i) in Current Accounts | 0.00 | 0.00 |
| | (ii) in Other Deposit Accounts | 0.00 | 0.00 |
| | (iii)Money at call and short notice | 0.00 | 0.00 |
| | **Total (i, ii, and iii)** | **0.00** | **0.00** |
| | **Grand Total (I and II)** | **53089994.94** | **63537230.55** |

### Schedule 8- Investments

| | | As on 31-3-2025 | As on 31-3-2024 |
|---|---|---|---|
| I. | **Investments in India** | | |
| | (i) Government Securities | 164512000.00 | 164512000.00 |
| | (ii) Other approved securities | 0.00 | 0.00 |
| | (iii) Shares | 0.00 | 0.00 |
| | (iv) Debentures and Bonds | 0.00 | 0.00 |
| | (v) Subsidiaries and/or joint ventures | 0.00 | 0.00 |
| | (vi) Others (to be specified) | 31998500.05 | 31998500.05 |
| | **Total** | **196510500.05** | **196510500.05** |
| II. | **Investments outside India** | | |
| | (i) Government securities (including local | 0.00 | 0.00 |
| | authorities) | 0.00 | 0.00 |
| | (ii) Subsidiaries and/or joint ventures abroad | 0.00 | 0.00 |
| | (iii) Others investments (to be specified) | 0.00 | 0.00 |
| | **Total** | **0.00** | **0.00** |
| | **Grand Total (I and II) Investment** | **196510500.05** | **196510500.05** |

### Schedule 9- Advances

| | | As on 31-3-2025 (Current Year) | As on 31-3-2024 (Previous Year) |
|---|---|---|---|
| A. | (i) Bills purchased and discounted | 0.00 | 0.00 |
| | (ii) Cash credits, overdrafts and loans repayable on demand. | 4265041.02 | 4852284.02 |
| | (iii) Term loans | 168264205.00 | 134549002.74 |
| | **Total** | **172529246.02** | **139401286.76** |
| B. | (i) Secured by tangible assets | 0.00 | 0.00 |
| | (ii) Covered by Bank/Government | 0.00 | 0.00 |
| | Guarantees | 0.00 | 0.00 |
| | (iii) Unsecured | 0.00 | 0.00 |
| | **Total** | **0.00** | **0.00** |
| C.I. | **Advances in India** | | |
| | (i) Priority Sectors | 0.00 | 0.00 |
| | (ii) Public Sector | 0.00 | 0.00 |
| | (iii) Banks | 0.00 | 0.00 |
| | (iv) Others | 0.00 | 0.00 |
| | **Total** | **172529246.02** | **139401286.76** |
| C.II. | **Advances outside India** | | |
| | (i) Due from banks | 0.00 | 0.00 |
| | (ii) Due from others | 0.00 | 0.00 |
| | (a) Bills purchased and discounted | 0.00 | 0.00 |
| | (b) Syndicated loans | 0.00 | 0.00 |
| | (c) Others | 0.00 | 0.00 |
| | **Total** | **0.00** | **0.00** |
| | **Grand Total (C.I and II)** | **172529246.02** | **139401286.76** |

### Schedules 10- Fixed Assets

| | | As on 31-3-2025 | As on 31-3-2024 |
|---|---|---|---|
| I. | **Premises** | | |
| | At cost as on 31st March, Preceding Year | 14769455.00 | 14769455.00 |
| | Additions during the year | 0.00 | 0.00 |
| | Deductions during the year | 0.00 | 0.00 |
| | Depreciation to date | 0.00 | 0.00 |
| | **TOTAL I** | **14769455.00** | **14769455.00** |
| II. | **Other Fixed Assets (including furniture and fixtures)** | | |
| | At cost as on 31st March, Preceding Year | 4557842.25 | 4440411.91 |
| | Additions during the year | 98500.00 | 117430.34 |
| | Deductions during the year | 0.00 | 0.00 |
| | Depreciation to date | 0.00 | 0.00 |
| | **TOTAL II** | **4656342.25** | **4557842.25** |
| | **Total (I and II) Fixed Assets** | **19425797.25** | **19327297.25** |

### Schedules 11- Other Assets

| | | As on 31-3-2025 | As on 31-3-2024 |
|---|---|---|---|
| I. | Inter-Office adjustments (net) | 0.00 | 0.00 |
| II. | Interest accrued | 12449946.52 | 13859321.49 |
| III. | Tax paid in advance/tax deducted at source | 25600.00 | 25600.00 |
| IV. | Stationary and stamps | 0.00 | 0.00 |
| V. | Non-banking assets acquired in satisfaction of claims | 0.00 | 0.00 |
| VI. | Others * | 3543882.82 | 3472177.52 |
| | **Total Other Assets** | **16019429.34** | **17357099.01** |

**** In case there is any unadjusted balance of loss the same may be shown under this item with appriopriate foot-note.***

### Schedule 12- Contingent Liabilities

| | | As on 31-3-2025 | As on 31-3-2024 |
|---|---|---|---|
| I. | Claims against the bank not acknowledged as debts | 0.00 | 0.00 |
| II. | Liability for partly paid investments | 0.00 | 0.00 |
| III. | Liability on account of outstanding forward exchange contracts | 0.00 | 0.00 |
| IV. | Guarantees given on behalf of consultants | 0.00 | 0.00 |
| | (a) In India | | |
| | (b) Outside India | | |
| V. | Acceptances, endorsements and other obligations | 0.00 | 0.00 |
| VI. | Other items for which the bank is contingently liable | 2808871.18 | 2773607.18 |
| | **Total Contingent Liabilities** | **2808871.18** | **2773607.18** |

### Schedule 13- Interest Earned

| | | As on 31-3-2025 (Current Year) | As on 31-3-2024 (Previous Year) |
|---|---|---|---|
| I. | Interest/discount on advances/bills | 28840812.43 | 26013661.77 |
| II. | Income on investments | 13951931.03 | 13629284.56 |
| III. | Interest on balances with Reserve Bank of India and other inter-bank funds | 0.00 | 0.00 |
| IV. | Others | 0.00 | 0.00 |
| V. | **Total Interest Earned** | **42792743.46** | **39642946.33** |

### Schedule 14- Other Income

| | | As on 31-3-2025 | As on 31-3-2024 |
|---|---|---|---|
| I. | Commission, exchange and brokerage | 176077.00 | 287934.02 |
| II. | Profit on sale of investments | 2397583.07 | 2142681.51 |
| | *Less:* Loss on sale of investments | 0.00 | 0.00 |
| | **Total** | **2397583.07** | **2142681.51** |
| III. | Profit on revaluation of investments | | 0.00 |
| | *Less:* Loss on revaluation of investments | | 0.00 |
| | **Total** | 0.00 | 0.00 |
| IV. | Profit on sale of land, buildings and other assets | | 0.00 |
| | *Less:* Loss on sale of land, buildings and other assets | | 0.00 |
| | **Total** | 0.00 | 0.00 |
| V. | Profit on exchange transactions | | 0.00 |
| | *Less:* Loss on exchange transactions | | 0.00 |
| | **Total** | 0.00 | 0.00 |
| VI. | Income earned by way of individuals, etc. | | 0.00 |
| | from subsidiaries/companies and/or joint ventures abroad/in India | | 0.00 |
| VII. | Miscellaneous Income | 408597.33 | 348609.70 |
| | **Total Other Income** | **2982257.40** | **2779225.23** |

***Note: Under items II to V loss figures shall be shown in brackets***

### Schedule 15- Interest Expended

| | | As on 31-3-2025 | As on 31-3-2024 |
|---|---|---|---|
| I. | Interest on deposits | 35996224.00 | 33822143.00 |
| II. | Interest on Reserve Bank of India/Inter-bank borrowings | 0.00 | 0.00 |
| III. | Others | 0.00 | 0.00 |
| | **Total Interest Expended** | **35996224.00** | **33822143.00** |

### Schedule 16- Operating Expenses

| | | As on 31-3-2025 | As on 31-3-2024 |
|---|---|---|---|
| I. | Payments to and provisions for employees | 3887506.00 | 3608175.00 |
| II. | Rent, taxes and lighting | 705440.18 | 656912.00 |
| III. | Printing and Stationary | 0.00 | 0.00 |
| IV. | Advertisement and publicity | 17769.52 | 9765.70 |
| V. | Depreciation on bank's property | 823205.00 | 842030.00 |
| VI. | Director's fees, allowances and expenses | 50750.00 | 33000.00 |
| VII. | Auditors' fees and expenses(including branch auditors) | 227121.68 | 228789.96 |
| VIII. | Law charges | 0.00 | 27500.00 |
| IX. | Postages, Telegrams, Telephones, etc. | 60337.05 | 86023.00 |
| X. | Repairs and Maintenance | 139784.00 | 80147.00 |
| XI. | Insurance | 496271.02 | 501161.32 |
| XII. | Other expenditure | 1276348.85 | 1123871.54 |
| | **Total Operating Expenses** | **7684533.30** | **7197375.52** |

## INDEPENDENT AUDITORS REPORT

(As required under Banking Regulation Act, Clause No. 30 and 31 read with section 81(5)(b) rule 69 of the Maharashtra Co-Op. Societies Act)

**Report On Financacial Statement**

We have audited the attached Balance Sheet of **GODAVARI URBAN CO-OPERATIVE BANK LTD, NANDED.** as at 31st March 2025 and also the annexed Profit & Loss Account for the year ended on that date . These Financial statements are the responsibility of the Bank's management. Our responsibility is to express an opinion on those financial statements based on our audit.

We conducted our audit in accordance with the auditing standards generally accepted in India. Those standards require that we plan and perform the audit to obtain reasonable assurance about whether the financial statements are free of material misstatements. An audit includes examining, on a test basis, evidence supporting the amounts and disclosures in the financial statements. An audit also includes assessing the accounting principles used and significant estimates made by the management as well as evaluating the overall financial statement presentation. We believe that our audit provides a reasonable basis for our opinion.

As reported by us in Part "A", "B" and "C" of our report, and subject to the limitations mentioned above in Para 1 and 2 the BALANCE SHEET and PROFIT AND LOSS ACCOUNT have been drawn up in accordance with the provisions of the Banking Regulation Act, 1949 read with Maharashtra Co-Operative Societies Act, 1960.

**We further state that**

Income Tax provision of Rs. 173000 & GST (RC) provision of Rs. 19920 has not been made, due to this the profit has been overstated.

As per profit & loss account profit of the bank is Rs. 1315586, due to above provisions, the profit shall be reduced by Rs. 192920. After considering the effects of above provisions, the profit of bank will be revised to Rs. 1122666.

**Subject to above Remarks, We report that :**

We have obtained all the information and explanations, which to the best of our knowledge and belief were necessary for the purpose of our audit and have found them to be satisfactory.

The transactions of the Bank which have come to our notice were within the powers of the Bank.

In our opinion, proper books of accounts as required by law were kept by the Bank so far as it appears from our examinations of those books and proper returns adequate for the purpose of our audit were received from the branches of the Bank.

The Balance Sheet and the Profit and Loss Account dealt with by this report are in agreement with the books of accounts and returns.

There has been no material impropriety and irregularity in the expenditure or in the realizations of the money due to the Bank, excepting the transactions reported in Part "A", "B" and "C" Audit Report of even date, the said accounts together with the notes thereon does give true and fair view in conformity with the accounting principles generally accepted in India and to our comment in Part "A".

In the case of Balance Sheet of the State of affairs of the Bank as on 31/03/2025.

In the case of the Profit & Loss Account of the Profit for the year ended as on that date.

**The Bank is awarded classification "A" Class for the financial year 2024-2025.**

For :
**M/S SPML & Associates**
Chartered Accountant
FRN No. 136549W
**C. A. Prakash Gattani** (Partner)
Membership No. 039757
Audit Panel No. 17342
UDIN : 25039757BMILJT2165

Date : 23/06/2024
Place : Nanded

# चंदेरी

# अयशस्वी लग्नापेक्षा उशिराने लग्न करणे चांगले...

**अभिनेत्री अर्शी खान बिग बॉस ११ मुळे प्रसिद्ध झाली. अनेकदा कोणत्या ना कोणत्या कारणाने चर्चेत असते. तिचे नाव अनेकांशी जोडले जाते. पण आजही ती अविवाहित आहे. आता तिने एका मुलाखतीत लग्नाबद्दल सांगितले. तिने सांगितले, की तिला आधी सेटल व्हायचे आहे. तिने असेही सांगितले, की अयशस्वी लग्न करण्यापेक्षा उशिरा लग्न करणे चांगले. अभिनेत्री ३२ वर्षांची आहे आणि ती अजूनही स्वतःला अविवाहित असल्याचे सांगते.**

## ३२ वर्षीय अर्शी खानने सांगितले कारण

अर्शी खान म्हणाली, लग्नाशी संबंधित प्रश्न मला अनेकदा घाबरवतात. मला कोणतीही अडचण नाही. हे माझे जीवन आहे आणि मी ते माझ्या पद्धतीने जगत आहे. मी स्वतःला भाग्यवान समजते की मी अशा कुटुंबात जन्मले आहे, जे माझ्यावर विश्वास ठेवते. मला समजून घेते आणि पाठिंबा देते. याशिवाय, मला कोणालाही उत्तर देण्याची गरज नाही. अर्शी खान पुढे म्हणाली, की मी माझ्या चाहत्यांची आणि प्रेक्षकांची आभारी आहे. कारण ते माझ्यासोबत आहेत. ट्रोलर्सचा माझ्यावर काही फरक पडत नाही. लग्नापूर्वी मी माझ्या जोडीदाराबद्दल खात्री करण्यासाठी वेळ काढत आहे. कारण लग्न हा खेळ नाही, जो तुम्ही करता आणि नंतर सोडून जाता. अर्शी खान म्हणाली, माझ्यासाठी हे खूप खास नातं असेल. मला उशिरा लग्न करण्यात काहीच अडचण नाही. पण मला माझ्या लग्नावर कोणताही धोका न घेता काम करायचं आहे आणि ते यशस्वी करायचं आहे. मी इतरांनाही हाच सल्ला देते. लोक आकर्षणासाठी लग्न करतात आणि नंतर तक्रार करतात. घटस्फोट घेताना मी लोकांना पाहिले आहे, जे हृदयद्रावक आहे, असे ती म्हणाली.



## विशेष मुलाखत : अभिनेता अली फजल

# लग्नाचे नाते फक्त जिद्दीवर टिकते...



**बॉलिवूड तसेच हॉलिवूडमध्ये आपली छाप सोडणारा मिर्झापूरचा रंगबाज गुड्डू भैया म्हणजेच अभिनेता अली फजल आता 'मेट्रो... इन दिनो' मध्ये प्रेमाची कहाणी सांगण्यासाठी येत आहे. अशा परिस्थितीत, त्याने प्रेम, लग्न, सिनेमा अशा अनेक पैलूंबद्दल विशेष मुलाखतीत चर्चा केली.**

- **प्रश्न : तुमचा चित्रपट प्रेमाच्या विविध रंगांनी रंगलेला आहे. आजकाल प्रेमाचे नाते खूप नाजूक झाले आहे. बेंचिंग, घोस्टिंग आणि सिच्युएशनशिप होऊ लागले आहे. याबद्दल तुमचे काय मत आहे?**
- **अली :** हे बेंचिंग, घोस्टिंग हे फक्त लेबल्स आहेत. लेबल्स पूर्वीही होते, आजही आहेत. आता फक्त नवीन शब्द आले आहेत, पण हो, नाते खूप नाजूक झाले आहे. पहा, पूर्वी लोक नातेसंबंधांसाठी काही तडजोड करायचे, जर त्यांनी काही त्याग केले तर नाते चालेल. आज संयम थोडा कमी झाला आहे, त्याचे एक मोठे कारण मोबाईल आहे. आज लोक फोनवर सॉरी बेब असे व्हॉइस नोट पाठवून नाते संपवतात.
- **प्रश्न : आजच्या काळात लोक रिचा चढ्ढासोबतच्या तुमच्या नात्याची उदाहरणे देतात. या नात्यामुळे तुम्हाला कसे बदलले आहे? यशस्वी लग्नाचा पाया तुम्हाला काय वाटतो?**
- **अली :** मला वाटते की या नात्यामुळे माझे नशीब बदलले आहे. मी खूप भाग्यवान आहे की आम्ही दोघे (अली फजल आणि रिचा चढ्ढा) एकत्र आहोत. मला याबद्दल जास्त बोलणे कठीण वाटते. आता मी एक वडील देखील आहे, म्हणून माझे काम संपल्यानंतर, मला रिचाकडे धाव घ्यावी लागते. आम्ही एकत्र एक निर्मितीदेखील सुरू केली आहे, म्हणून त्यातही १० गोष्टी घडत राहतात. माझा असा विश्वास आहे की प्रेमाचे नाते टिकवणे हा एक हट्टीपणा आहे आणि जोपर्यंत तो हट्टीपणा आहे तोपर्यंत नाते टिकते. मला खरोखर असे वाटते की नाते फक्त हट्टीपणावर चालते. ज्या दिवशी तुम्ही हार मानता, जी खूप सोपी गोष्ट आहे, त्या दिवशी नाते तुटते.
- **प्रश्न : तू हिंदी चित्रपट, ओटीटी आणि हॉलिवूडमध्ये काम केले आहेस. या वेगवेगळ्या ठिकाणी काम करत असताना, एक अभिनेता म्हणून तुला स्वतःमध्ये काही बदल करावे लागतात का?**
- **अली :** मी मन लावून काम करतो. त्यात कोणताही बदल झालेला नाही. पण हो, वेगवेगळ्या माध्यमांच्या वेगवेगळ्या आवश्यकता असतात. उदाहरणार्थ, जेव्हा आपण मिर्झापूरसारखी वेब सिरीज करतो तेव्हा त्यासाठी खूप संयम लागतो. ते खूप कठीण असते. हॉलिवूडची पद्धत वेगळी आहे, कारण त्यांचे बजेट वेगळे आहे. सुदैवाने मी स्टुडिओ चित्रपटांचा भाग आहे, जे खूप मोठ्या बजेटचे असतात. तिथे सर्व काही खूप पद्धतशीरपणे, आरामात घडते. तुम्हाला आठवड्याच्या शेवटी सुट्ट्यादेखील मिळतात, ज्याबद्दल आम्ही कधीही ऐकले नव्हते. मला कधीकधी कंटाळा यायचा. मी रिचाला फोन करायचो आणि तिला सांगायचो की मला कंटाळा येत आहे, इथे सुट्टी आहे (हसतो).
- **प्रश्न : आता तूही निर्माता झाली आहेस. गेल्या काही काळापासून थिएटर आणि प्रेक्षकांमध्ये जे अंतर दिसून येत आहे त्याचे कारण काय आहे असे तुला वाटते?**
- **अली :** बघा, आपण ज्या पद्धतीने कंटेंट बनवत आहोत आणि ज्या पद्धतीने प्रेक्षकांसमोर घेऊन येत आहोत, ते आता बदलायला हवे. तेच तेच लोकांसमोर आणले गेल्याने लोकही आता कंटाळलेले आहेत. कधीकधी कंटेंट वाईट असतो आणि तुम्ही ते चांगले विकता, मग लोक निराश होऊन जातात. कधीकधी तुम्हाला चांगला कंटेंट विकता येत नाही, परंतु लोक थिएटरमध्ये येणे खूप महत्वाचे आहे. आमिर खान यांचा सितारे जमीन पर हा चित्रपट खूप चांगला चालत आहे. भविष्यात आणखी बरेच चित्रपट चालावेत अशी माझी इच्छा आहे, जेणेकरून थिएटर आणि प्रेक्षकांमधील संबंध पुन्हा मजबूत होतील. तो संबंध तुटला आहे, परंतु यासाठी आपल्याला असा कंटेंट द्यावा लागेल. आपण म्हणतो की थिएटरमध्ये चित्रपट पाहणे हा एक अनुभव आहे, परंतु तो अनुभव इतका महाग झाला आहे की जर चार जणांचे कुटुंब गेले तर ३ ते ४ हजार रुपये खर्च होतील. आता अशा परिस्थितीत लोक काळजीपूर्वक विचार करून जातील. तिथेही जर त्यांना चांगला सिनेमा मिळाला नाही, तर ते घरी असे वातावरण तयार करतील की बेटा, पॉपकॉर्न काढ आणि इथे एक पॉज बटण आहे, चित्रपट संपला की थांब.
- **प्रश्न : ३ इडियट्स आणि फुकरे नंतर, मेट्रो... इन दिनो चित्रपटात तू गिटार घेऊन दिसतोस. गिटार तुझा पिच्छा सोडत नाहीये, या चित्रपटाचा अनुभव कसा होता?**



- **अली :** अरे यार, मी गिटारमध्ये अडकतो आणि मग माझे मित्र जे खरोखर गिटार वाजवतात ते मला शिवीगाळ करतात की तुला अशा भूमिका मिळतात, तू काहीही वाजवतोस आणि आपल्याला बघावे लागते (हसते). यामुळे, मी गिटार वाजवायला थोडे शिकलो आहे, पण मला सराव करण्यासाठी वेळ मिळत नाही. मेट्रो... इन दिनो... चा अनुभव चांगला होता. सुरुवातीला, वातावरण थोडे घट्ट होते, कारण दादांनी (दिग्दर्शक अनुराग बसू) कथा सांगितली होती. नंतर त्यांनी सांगितले की तुला गाणेही गायला हवे. तुला हे करावे लागेल, तुला ते करावे लागेल, पण मला स्क्रिप्ट मिळाली नव्हती आणि शूटिंगचा पहिला दिवस आला होता. पण दादा त्याच्या कामात तज्ञ आहेत. तो खूप चांगला दिग्दर्शक आहे, म्हणून मला तो खूप आवडला.

# वयातील अंतरामुळे शेफाली होऊ शकली नव्हती आई

**'कांटा लगा गर्ल' शेफाली जरीवालाचं हृदविकाराच्या झटक्याने निधन झालं आहे. ती ४२ वर्षांची होती. १९ व्या वर्षी 'कांटा लगा' या म्युझिक व्हिडीओतून लोकप्रियता मिळाल्यावर ती घराघरांत ओळखली जाऊ लागली. शेफाली जरीवालाचं वैयक्तिक आयुष्य खूप चढ-उतारांनी भरलेलं राहिलं. तिला आई होऊ न शकल्याची खंत होती.**



शेफालीच्या पतीचं नाव पराग त्यागी आहे. 'पवित्र रिश्ता' फेम पराग त्यागी व शेफालीने २०१४ साली लग्न केलं. लग्न करण्यापूर्वी दोघेही लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहत होते. दोघांचं एकमेकांवर खूप प्रेम होतं. दोघेही वेगवेगळ्या ठिकाणी फिरायला जायचे आणि तिथले खास फोटो सोशल मीडियावर पोस्ट करायचे. शेफालीचे लाखो चाहते आहेत. शेफाली जरीवालाच्या लग्नाला ११ वर्षे झाली होती, पण तिला बाळ नव्हतं. आई न होऊ शकण्याबद्दल एकदा ती व्यक्त झाली होती. शेफाली म्हणाली होती, की मूल जन्माला कुणीली घालू शकतं, पण मला वाटतं की जगात अशी अनेक मुलं आहेत ज्यांना घराची गरज आहे, प्रेमाची गरज आहे. प्रत्येकजण आपल्या मुलांवर प्रेम करतो, पण जो दुसऱ्याच्या मुलाला आपल्या घरात आणतो आणि त्याचे पालनपोषण करतो तो सर्वात महान आहे. वयाच्या १२-१३ व्या वर्षी जेव्हा मला मूल दत्तक घेणं ही गोष्ट समजली तेव्हापासूनच माझ्या मनात मूल दत्तक घेण्याचा विचार आला होता, असं शेफाली म्हणाली होती. बाळ दत्तक घेण्याच्या निर्णयात तुम्हाला पती व तुमच्या कुटुंबियांचाही पूर्ण पाठिंबा असावा लागतो. आमच्या घरात मूल दत्तक घ्यायला सगळे तयार आहेत, पण मूल दत्तक घेण्याची प्रक्रिया इतकी मोठी असते की त्या काळात मुलं मोठी होतात. प्रत्येकाला लहान मूल हवं असतं. पराग आणि मी खूप दिवसांपासून मूल दत्तक घेण्याचा विचार करत होतो, पण ते शक्य होत नाहीये. दुसरं म्हणजे माझ्या आणि परागच्या वयात खूप अंतर आहे, असं शेफालीने म्हटलं होतं.

### पराग व शेफालीच्या वयातील अंतर

शेफाली जरीवाला ही ४२ वर्षांची होती, तर तिचा पती पराग ४९ वर्षांचा आहे. दोघांच्या वयात सात वर्षांचे अंतर आहे. माझ्या व माझ्या पतीच्या वयातील अंतरामुळे मला आई होण्यासाठी अनेक अडचणींचा सामना करावा लागला आहे. आम्ही सर्व प्रयत्न करून थकलो आहोत. आता वाटतं की जेव्हा देवाची इच्छा असेल तेव्हाच आमच्या घरी नवीन पाहुणा येईल, असं शेफाली म्हणाली होती. दरम्यान, आता शेफालीच्या निधनाची बातमी आल्याने चाहते हळहळ व्यक्त करत आहे. इंडस्ट्रीतील कलाकारांनाही तिच्या निधनाचा धक्का बसला आहे.

### शेफाली जरीवाला 'इतक्या' कोटींच्या संपत्तीची मालकीण

टीव्ही व सिनेसृष्टीत असे अनेक कलाकार आहेत, ज्यांनी खूप लहान वयात प्रचंड लोकप्रियता मिळवली. याच लोकांपैकी शेफाली जरीवाला एक आहे. तिने अवघ्या १९ व्या वर्षी इंडस्ट्रीमध्ये 'कांटा लगा' या सुपरहिट म्युझिक व्हिडीओतून धमाकेदार एन्ट्री केली. या गाण्याने तिला रातोरात प्रसिद्धी मिळाली. इतक्या वर्षांनंतर चाहते आजही तिला 'कांटा लगा गर्ल' या नावाने ओळखतात. शेफालीने तिचे सुरुवातीचे शिक्षण अहमदाबाद येथून पूर्ण केले. त्यानंतर ती इंजिनिअरींगचे शिक्षण घेण्यासाठी मुंबईत आली. मुंबईत आल्यावर तिला 'कांटा लगा' या गाण्यात काम करण्याची संधी मिळाली आणि तिचं नशीब पालटलं. या गाण्याच्या प्रचंड यशानंतर, शेफालीने अनेक प्रसिद्ध टीव्ही शो आणि चित्रपटांमध्ये काम केले. तिने 'मुझसे शादी करोगी' (२००४) आणि 'हुडुगारू' (२०११) सारख्या चित्रपटांमध्ये छोट्या पण दमदार भूमिका केल्या. तसेच तिने 'बूगी वूगी', 'नच बलिये ५', 'नच बलिये ७' आणि 'बिग बॉस १३' या रिॲलिटी शोमध्येही भाग घेतला होता. शेफाली जरीवालाकडे ७.५ कोटी रुपयांची संपत्ती आहे. तिच्या उत्पन्नाचे स्त्रोत प्रामुख्याने शो, वेब सीरिज व जाहिरात होते. तसेच ती सोशल मीडियावर पेड प्रमोशन करून पैसे कमवायची.



# 'रामायण'मध्ये कामास जयदीपने दिला नकार

**अभिनेता रणबीर कपूर सध्या त्याच्या 'रामायण' या आगामी चित्रपटाच्या चित्रीकरणामध्ये व्यस्त आहे. 'रामायण' चित्रपटाची सध्या सर्वत्र चर्चा सुरू आहे. या चित्रपटातून बॉलीवूडमधील अनेक प्रसिद्ध कलाकार झळकणार आहेत. अशातच एका प्रसिद्ध अभिनेत्यानं या चित्रपटात काम करण्यास नकार दिल्याबद्दलची माहिती नुकतीच दिली आहे. हा अभिनेता म्हणजे 'महाराज', 'ज्वेल थीफ' यांसारख्या चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला आलेला जयदीप अहलावत.**



जयदीप अहलावतनं त्याच्या दमदार अभिनयानं प्रेक्षकांच्या मनामध्ये स्वतःचं वेगळं स्थान निर्माण केलं आहे. गेल्या काही दिवसांत तो विविध कलाकृतींमधून झळकला. त्यामधून त्यानं वेगवेगळ्या भूमिका साकारत प्रेक्षकांचं मनोरंजन केलं. त्यामुळे त्याचे चाहते आता त्याला नवीन भूमिकेत पाहण्यासाठी उत्सुक आहेत. जयदीप म्हणाला, रणबीर कपूरची मुख्य भूमिका असलेल्या 'रामायण' चित्रपटात त्याला बिभीषण या भूमिकेसाठी विचारणा झाली होती. तो 'रामायण' या चित्रपटातून झळकणार होता. परंतु, काही कारणांमुळे त्यानं या चित्रपटात काम करण्यास नकार दिला. जयदीप 'रामायण' चित्रपटातील भूमिका न करण्यामागचं कारण सांगत म्हणाला, बिभीषण हा रावणाचा धाकटा भाऊ आहे. त्यामुळे चित्रपट निर्मात्यांना असा कोणीतरी अभिनेता हवा होता, जो 'केजीएफ'फेम अभिनेता यशबरोबरच्या चित्रीकरणाच्या तारखांनुसार काम करू शकेल. कारण यश या चित्रपटात रावणाची भूमिका साकारत आहे. त्यामुळे हे दोघे भाऊ असल्यानं आमचे बरेच सीन एकत्र होणार. त्याकरिता आमच्या दोघांच्या तारखा जुळणं महत्त्वाचं आहे. मला माहीत आहे की, यशच्या तारखा त्यांच्यासाठी जास्त महत्त्वाच्या आहेत. 'रामायण' या आगामी चित्रपटाचं दिग्दर्शन नितेश तिवारी करीत आहेत. सध्या या चित्रपटाचं चित्रीकरण सुरू आहे. २०२४ साली या चित्रपटाची घोषणा झाली होती. 'रामायण'मध्ये लोकप्रिय अभिनेता रणबीर कपूर व दाक्षिणात्य अभिनेत्री साई पल्लवी श्रीराम व सीता यांच्या भूमिका साकारणार आहेत. अभिनेता सनी देओल यामध्ये हनुमानाची भूमिका साकारणार आहे. 'केजीएफ'फेम अभिनेता यश या चित्रपटातून रावणाच्या भूमिकेतून झळकणार आहे. तर, मराठमोळा अभिनेता आदिनाथ कोठारे यामध्ये श्रीरामाच्या भावाची भरतची भूमिका साकारणार आहे.

### 'किंग'मध्ये झळकणार

अभिनेता शाहरुख खान सध्या त्याच्या 'किंग' या आगामी चित्रपटाच्या चित्रीकरणामध्ये व्यस्त आहे. या चित्रपटात त्याच्यासह प्रसिद्ध अभिनेत्री दीपिका पादुकोण, रानी मुखर्जी, अनिल कपूर, सुहाना खान ही मंडळी झळकणार आहेत. 'किंग' चित्रपट २०२६ मध्ये प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटात बॉलीवूडमधील प्रसिद्ध कलाकार झळकणार आहेत. त्यांच्यासह आता प्रसिद्ध अभिनेता जयदीप अहलावतही 'किंग' चित्रपटात झळकणार आहे.

# अभिनेता राहुल बोस म्हणतो, आई मला रोज मारायची !

**अभिनेता राहुल बोस जवळजवळ तीन दशकांपासून हिंदी चित्रपटसृष्टीत काम करत आहे. तो आपल्या उत्तम अभिनयासाठी ओळखला जातो. राहुलने अनेक चित्रपटांमध्ये लहान-मोठ्या भूमिका केल्या. पण त्याचं करिअर फार यशस्वी राहिलं नाही. राहुलने आता लहानपणी त्याचं संगोपन कशा वातावरणात झालं, याचा खुलासा केला आहे.**



राहुल मुलाखतीत म्हणाला की त्याच्या घरात आई-वडील दोघेही अगदी वेगळ्या विचारांचे होते. सामान्य घरात जी भूमिका आई पार पाडते ती राहुलच्या घरात वडिलांनी पार पाडली, तर वडिलांची भूमिका आईने पार पडली. कारण राहुलचे वडील चांगले कपडे घालायला आणि प्रेझेंटेबल राहायला सांगायचे, तर त्याची आई करिअरवर लक्ष केंद्रित करायला आणि वेगवेगळे खेळ खेळायला सांगायची. माझी आई कधीच स्वयंपाक करत नव्हती, घरी नेहमी माझे वडील स्वयंपाक करायचे. माझी आई मला ५ वर्षे दररोज मारायची. मी इतका रिकामटेकडा होतो की आईने मारलं त्याची मला मदतच झाली. आता खरंच कोणी असं सांगणार नाही, पण माझ्यावर विश्वास ठेवा, त्या काळी मी असाच होतो, असं राहुल बोस म्हणाला. कठीण खेळांमध्ये राहुलला रस होता, त्याबद्दल वडिलांची प्रतिक्रिया काय होती, असं त्याला विचारण्यात आलं. मी शाळेत बॉक्सिंग करत होतो आणि माझे वडील घाबरले होते. ते मला टोपी घालायला सांगायचे जेणेकरून उन्हात मी काळवंडणार नाही. मी क्रिकेट खेळावं आणि एक चांगला सज्जन माणूस व्हावं, अशी त्यांची इच्छा होती. राहुल बोस हा 'मिस्टर अँड मिसेस अय्यर', 'आय ॲम', बुलबुल, 'कालपुरुष' यासारख्या चित्रपटांमधील त्याच्या विविध भूमिकासांठी ओळखला जातो. तो शेवटचा 'बर्लिन' चित्रपटात दिसला होता.

# ११ वी प्रवेशाची पहिली यादी जाहीर

## ७ जुलैपर्यंत प्रवेश घेण्याचे शिक्षण संचालनालयाचे आवाहन

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यातील अकरावीच्या विद्यार्थ्यांना उत्सुकता लागलेल्या ११ वी प्रवेशाची यादी दोन दिवसांआधीच जाहीर झाली आहे. विशेष म्हणजे ११ वी प्रवेशाची पहिली यादी ३० जूनला जाहीर होणार होती, पण पहिली गुणवत्ता यादी आजच शिक्षण संचालनालयाकडून जाहीर करण्यात आली आहे.

जवळपास मागील दीड महिन्यापासून दहावी उत्तीर्ण विद्यार्थी अकरावी प्रवेशाची वाट पाहत होते. राज्यातील १२ लाख ७१ हजार विद्यार्थ्यांनी यंदा अकरावीत कॉलेजसाठी (उेश्रश्रशसश) ऑनलाइन प्रवेशासाठी नोंदणी केली आहे. दरम्यान, विद्यार्थी व पालकांना https://mahafyjcadmissions.in या वेबसाईटवर प्रवेशाची पहिली गुणवत्ता यादी पाहता येणार आहे.

सरकारने जाहीर केलेल्या यादीनुसार ३० जून ते ७ जुलै दरम्यानच्या कालावधीत पहिल्या गुणवत्ता यादीमध्ये कॉलेज मिळालेल्या विद्यार्थ्यांना कॉलेजमध्ये जाऊन आपला प्रवेश निश्चित करायचा आहे. संगणक प्रणालीमध्ये आवश्यक ते बदल करुन पारदर्शक व निकोप पध्दतीने प्रवेश प्रक्रिया होण्यासाठी पहिली गुणवत्ता यादी आता ३० जून रोजी जाहीर होणार असल्याचे सांगण्यात आले होते. मात्र, आजच यादी जाहीर झाली असून १ ते ७ जुलै दरम्यान मिळालेल्या कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश घेण्यासाठीचा वेळ दिला आहे. दहावी बोर्ड परीक्षा निकाल जाहीर होऊन दीड महिना झाला अजूनही प्रवेशाच्या प्रतीक्षेत १२ लाख ७१ हजार विद्यार्थी आहेत. दरम्यान, विद्यार्थ्यांनी https://mahafyjcadmissions.in या वेबसाईटवर जाऊन आपली गुणवत्ता यादी पाहून प्रवेशाचा निर्णय घ्यावा.

राज्याच्या दहावी बोर्ड परीक्षेचा निकाल १३ मे रोजी जाहीर झाला. निकाल जाहीर होऊन जवळपास आता दीड महिना होत आलाय. मात्र, अजूनही दहावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा अकरावीमध्ये प्रवेश झालेला नाही. विद्यार्थी अजूनही पहिल्या गुणवत्ता यादीच्या प्रतीक्षेत आहेत.

## दहशतवादी साकिब नाचणचा दिल्लीत मृत्यू

**मुंबई (प्रतिनिधी)–** कुविख्यात दहशतवादी म्हणून ओळखला जाणारा साकिब नाचण याचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. भिवंडी तालुक्यातील पडघा–बोरिवली हे साकिब नाचण याचे मूळगाव आहे.

बोरिवली आणि पडघा या दोन्ही ठिकाणी २०० हून अधिक पोलिसांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला असून गावात येणाऱ्या प्रत्येक वाहनांची कसून तपासणी सुरू केली आहे. मुंबई सिरीयल बॉम्ब ब्लास्टमध्ये साकीब नाचण हा मुख्य आरोपी होता. त्यानंतर ISISI मोड्युलमध्ये डिसेंबर २०२३ मध्ये NI ने पुन्हा त्याला अटक केली होती.

## ग्राहकांची बिले नगरपालिकेच्या नावावर टाकली; ३९ लाखांचा अपहार, २ अभियंते निलंबित

**बीड (प्रतिनिधी) –** ऐकावं ते नवलच असा प्रकार आता बीड जिल्ह्याच्या बाबतीत पुढे येत आहे. येथील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकारानंतर बीडमधील दहशत, गुंडगिरी आणि पोलीस व प्रशासनातील काही अधिकाऱ्यांची मनमानी सातत्याने पुढे येत होती. तसेच, विविध ठेकेदारी, राख माफिया, टँकर माफिया, टिप्पर माफियांचेही कारनामे समोर आले होते. प्रशासनातील एका अधिकाऱ्याचा प्रताप समोर आला असून या महाशयांनी चक्क ३९ लाख रुपयांचा अपहार वीजबिलात केल्याचे उघडकीस आले आहे. याप्रकरणी महावितरणने दोघांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.

बीडच्या परळीमध्ये खासगी ग्राहकांच्या घरची बिले नगरपरिषदेच्या नावावर टाकून त्याद्वारे रक्कम जमा करत ३९ लाख रुपयांचा अपहार झाल्याची तक्रार सामाजिक कार्यकर्ते ब्रह्मदेव चाटे यांनी महावितरणकडे केली होती.

त्यानंतर, आता महावितरणने या तक्रारीची दखल घेत विभागातील रत्नदीप कटके व प्रशांत आंबडकर या दोन अभियंत्यांना निलंबित केले आहे.

आंबडकर आणि कटके यांच्या आयडीवरुन पोर्टलवर सदरील सर्व प्रकार करण्यात आल्याचे निलबंन पत्रात नमूद केलेले आहे. त्यानंतर महावितरणकडून ही कारवाई करण्यात आली.तसेच आता या प्रकारात आणखी कोणी सहभागी आहे का? याची देखील चौकशी केली जात असून जे अधिकारी कर्मचारी या प्रकारात दोषी आढळतील त्यांच्यावर कारवाई केली जाणार असल्याचे संकेत बीड येथील अधीक्षक अभियंता राजपूत यांनी दिले आहेत.


### टी.सी.हरवली

माझी संभाजी लक्ष्मण निलेवाड या नावाची बीए तृतीय वर्षापसची टिसी लोहा ते डोंगरगाव बस प्रवासात हरवलेली आहे. कोणास सापडल्यास खालील पत्यावर संपर्क साधावा.

**:–संपर्क पत्ता :–**
**संभाजी लक्ष्मण निलेवाड**
**मु.पो.डोंगरगाव ता.लोह**
**जि.नांदेड मो.**
**८८३०४९९४०८**

### टी.सी.हरवली

माझी माझी ऋषिकेश संजय जानकर या नावाची १२ वी विज्ञान पास ची टि.सी.रोजी सिडको ते लातूर पाटा ऑटो प्रवासात हरवली आहे. कुणाला सापडल्यास खालील पत्यावर संपर्क करावा.

**–संपर्क पत्ता –**
**ऋषिकेश संजय जानकर**
**ओंकारनगर हडको नविन नांदेड मो.८३९०६८४२८०**

### टी.सी.हरवली

माझी शिंदे विजय साहेबराव या नावाची बी.एड पासची टी.सी व अन्य शैक्षणिक कागदपत्रे नायगाव ते नांदेड प्रवासात हरवले आहेत कोणास सापडल्यास खालील पत्यावर संपर्क साधा.

**संपर्क पत्ता:– विजय साहेबराव शिंदे**
**रा. पाटोदा ता. नायगाव जि.नांदेड.**
**मो.क्रमांक :–**
**८७८८९८१३९३.**

### जय जवान जय किसान शिक्षण प्रसारक मंडळ कंधार संचलीत
### स्वामी रामानंद तीर्थ अध्यापक विद्यालय बाळांतवाडी कंधार ता.कंधार जि.नांदेड
### महाराष्ट्र शासन व एन.सी.टी.ई मान्यता प्राप्त कायम विना अनुदानित मराठी माध्यम
### एन.सी.टी.ई कोड १२२४

## पाहिजेत

आमच्या अध्यापक विद्यालयासाठी खालील निर्देशित केलेल्या प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या नियुक्तीसाठी खालील प्रमाणे मुलाखती आयोजित केली आहे.

| अ.क्र. | पद नाम व विषय | पदसंख्या | माध्यम | शैक्षणिक अर्हता | अनुभव |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्राचार्य | ०१ | मराठी | एम.ए./एम.एस्सी आणि एम.एड ५५ टक्के गुणासह उत्तीर्ण | १० वर्षे |
| २ | सहशिक्षक १)मराठी, २)इंग्रजी ३) हिंदी ४) विज्ञान ५)गणित ६)इतिहास ७)भूगोल | २४ | | एम.ए./एम.एस्सी एम.एड किंवा बी.ए./बी.एसी.बी.एड ५५ टक्के गुणासह उत्तीर्ण | ५ वर्षे |
| ३ | कला शिक्षक | ०२ | | बी.ए.ए.टी.डी. | ०५ |
| ४ | संगित शिक्षक | ०२ | | संगीत विशारद | ०५ |
| ५ | क्रिडा शिक्षक | ०१ | | बी.ए.बी.पी.एड/एम.ए.एम.पी.एड | ०५ |
| ६ | कार्य शिक्षक | ०१ | | सी.टी.सी. | ०५ |
| ७ | वरिष्ठ शिक्षक | ०१ | | बी.ए./एम.ए.मराठी आणि इंग्रजी टायपिंग संगणक ज्ञान(MSCIT) | ०२ |
| ८ | कनिष्ठ शिक्षक | ०१ | | बी.ए.मराठी आणि इंग्रजी टायपिंग संगणक ज्ञान(MSCIT) | ०२ |
| ९ | ग्रंथपाल | ०१ | | बी.लिब./एम.लिब | ०२ |
| १० | प्रयोगशाळा सहाय्यक | ०१ | | बी.ए./बी.एस्सी | ०२ |
| ११ | शिपाई | ०४ | | १० वी/१२ उत्तीर्ण | |

टिपा–१) वेतन व भत्ते एन.सी.टी.ई व एस.सीईआर.टी. महाराष्ट्र नियमाप्रमाणे अनुज्ञेय राहील २) महाराष्ट्र शासन व नियमाप्रमाणे आरक्षण लागू राहील ३) एम.एड उमेदवार उपलब्ध न झाल्यास एम.ए./एम.एस्सी बी.एड.५५ गुणांहस उत्तींण उमेदवार प्राधान्य देण्यात येईल ४) उमेदवाराने मुलाखतीसाठी स्वखर्चाने शैक्षणिक अर्हतेच्या मुळ प्रमाणपत्र व चार रंगीत पासपोर्ट फोटोसह उपस्थित रहावे. ५) तसेच कोणत्याही प्रकारचा भत्ता दिला जाणार नाही ६) मुलाखत दिनांक २ जुलै २०२५ बुधवार सकाळी ११.०० वाजता

मुलाखत स्थळ–स्वामी रामानंद तीर्थ अध्यापक विद्यालय बाळांतवाडी कंधार ता.कंधार जि.नांदेड

**सचिव/प्राचार्य**
**जय जवान जय किसान शिक्षण प्रसारक मंडळ कंधार संचलीत**
**स्वामी रामानंद तीर्थ अध्यापक विद्यालय बाळांतवाडी कंधार ता.कंधार जि.नांदेड**
**मो.७७७४०६३६५९, ९९६०७५५४५५**

### वीज –कामगार को–ऑप क्रेडीट सोसायटी लि नांदेड.

## जाहीरात

वीज कामगार को– ऑप क्रेडिट सोसायटी लि. नांदेड सन २०२५ २०२६ या आर्थीक वर्षाचे लेखा परीक्षण करण्या करीता सहकार खात्याच्या पॅनल वरील सी.ए. वैधनिक लेखा परीक्षक यांच्या कडून अर्ज मागविण्याचे संचालक मंडळ सभा दि. २२/०६/२०२५ ठराव क्रमांक ९ नुसार ठरले आहे.संबंधीत लेखा परिक्षकाकडून संस्थेचे दिनांक १/४/२०२५ ते ३१/३/२०२६ या कालावधीत व्यवहार (तपासुन) अंतर्गत लेखा परीक्षण करून त्यांचा अहवाल संस्थेत सादर करणे आवश्यक आहे. तरी संबधीत इच्छूक सी.ए. यांनी दिनांक ९/७/२०२५ च्या आत आपले अर्ज संस्थेत सादर करावे.

**मानद सचिव**
**वीज कामगार को–ऑप क्रेडीट सोसायटी लि. नांदेड**
**संस्थेचा पत्ता**
**वीज कामगार को–ऑप क्रेडिट सोसायटी लि.नांदेड**
**मो.७८७५९६४२२२**

### वीज –कामगार को–ऑप क्रेडीट सोसायटी लि नांदेड.

## जाहीरात

वीज कामगार को– ऑप क्रेडिट सोसायटी लि. नांदेड सन २०२५ २०२६ या आर्थीक वर्षाचे लेखा परीक्षण करण्या करीता सहकार खात्याच्या पॅनल वरील सी.ए. वैधनिक लेखा परीक्षक यांच्या कडून अर्ज मागविण्याचे संचालक मंडळ सभा दि. २२/०६/२०२५ ठराव क्रमांक १३ नुसार ठरले आहे.

संबंधित शासन निर्णय क्र. सग्रयो–२०१२/मुमंस १७/प्र.क्र.३६/१४–स तारीख २९/१०/२०१४ च्या निर्णयातील व शर्तीनुसार पात्र ग्रेड ए १ यादित असणारे सी.ए. यांनी प्रोफाईल ऑन लाईन पुर्ततेसह अशा ईच्छुक सी.ए. लेखा परीक्षकांनी दि. ९/०७/२०२५ च्या आत आपले अर्ज संस्थेत सादर करावेत.

**मानद सचिव**
**वीज कामगार को–ऑप क्रेडीट सोसायटी लि. नांदेड**
**संस्थेचा पत्ता**
**वीज कामगार को–ऑप क्रेडिट सोसायटी लि.नांदेड**
**व्हीआयपी रोड महादेव दालमिल समोर नांदेड**
**मो.७८७५९६४२२२**

### जाहीर प्रगटन

या जाहीर प्रगटनाद्वारे गोदावरी नगर सहकारी गृहनिर्माण संस्था म. सिडको, नवीन नांदेड ता.जि.नांदेड या संस्थेच्या सर्व सभासदांना व हितसंबंधित जनतेस कळविण्यात येते की, संस्थेचे सभासद श्री. बालाजी नागनाथ वडगांवकर, रा.बालाजी मंदिराजवळ, हडको, नांदेड यांनी त्यांचा प्लॉट क्र.२०६ ज्याचा म.न.पा.घर क्र.११–७–६०० क्षेत्रफळ १९२ चौ.मि. हा श्री. गंगाराम छोटुलाल भातावाले, रा.रहिमपूर, वसरणी, सिडको, नांदेड यांना रु.९०,००,०००/– (अक्षरी– रुपये नव्वंद लाख फक्त) मध्ये कायमस्वरुपी विक्री करण्यासाठी दि.०७ जून २०२५ रोजी सौदाचिठ्ठी नोटरीकृत केलेली असून दि.२०/०६/२०२५ रोजीच्या अर्जाद्वारे सदर प्लॉटचे हस्तांतरण करण्याची विनंती केलेली आहे.

तरी श्री. बालाजी नागनाथ वडगांवकर यांच्या प्लॉट क्र.२०६ ज्याचा म.न.पा.घर क्रं.११–७–६०० या प्लॉटचे हस्तांतरण करणे बाबत काही आक्षेप/ हरकती असल्यास सदरील जाहीर प्रगटनाचे दिनांकापासून (१५) दिवसांच्या आत निम्नस्वाक्षरीकार यांच्याकडे मा.उपनिबंधक, सहकारी संस्था ता. नांदेड यांचे कार्यालय, भूविकास बँक इमारत, आयटीआय समोर, विसावानगर, नांदेड येथे लेखी स्वरुपात नोंदवावेत. विहीत कालावधीनंतर प्राप्त झालेल्या आक्षेप/ हरकती यावर कोणताही विचार केला जाणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

**(बी. बी. बोधगिरे)**
**अवसायक**
**गोदावरी नगर सहकारी गृहनिर्माण संस्था म. सिडको, नवीन नांदेड ता.जि.नांदेड**

### जाहीर प्रगटन

मौजे कांकाडी ता.जि. नांदेड हद्दीतील शेत गट नंबर २६८ मधील २ एकर ७.५० गुंठे(८७.५) शेत जमिन सय्यद सखलेन सय्यद सलीम (४.७५) २.सय्यद समीर सय्यद अहेमद (४३.७५) यांचेकडून सुरज शिवाजी कदम २.शेख रियाज महेताब साब यांनी विकत घेण्याचा सौदा केला असून बयाना म्हणून काही रक्कम दिली आहे.

शेतजमिनीची चुर्तसिमा पुर्वेस–हरदिपसिंघ बलदेवसिंघ धिलोन यांचे शेत, पश्चिमेस– लिहून देणाऱ्याची उर्वरीत जमिन, दक्षिणेस–नांदेड–देगलूर रोड,उत्तरेस – लिहून देणाऱ्याचे शेत

तरी वरील शेत जमिनी बद्दल कोणाचा काही हक्क, उजर, दावा आक्षेप सरकारी किंवा निमसरकारी बोजा असेल त्यांनी आपला उजर/ आक्षेप हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या उजर आक्षेप ग्राहय धरल्या जाणार नाही व नंतर शेत जमिनीचे खरेदी खत करण्यात येईल. करीता हे जाहीर प्रगटन

**जाहीर प्रगटन देणार**
**सुरज शिवाजी कदम मो.९९२१८७०८००**
**शेख रियाज महेतासाब मो.७०२०८२१२३६**

### टी.सी.हरवली

माझी जाधव युवराज बळीराम या नावाची १० वी पासची टिसी व कागदपत्रे अर्धापूर ते नांदेड एसटीच्या प्रवासा दरम्यान हरवली आहेत कुणाला सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा **–संपर्क पत्ता**
**बळीराजा नागोराव जाधव**
**रा.सांगवी (खु.) पो.कामठा**
**(बु) ता.अर्धापूर जि.नांदेड**
**मो.नं.८७६६४८९५११**

### टी.सी.हरवली

माझी कुमारी अंजली गणेश वडवळे या नावाची १२ पासची टी.सी. कापसी (बु.) ते नांदेड प्रवासात हरवली आहे. तरी कोणाला सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा ही विनंती. **–संपर्क पत्ता**
**मु. पो. कापसी ( बु. )**
**ता. लोहा जि. नांदेड**
**मो.–– ९१६८२१२२२७**

## Change In Name

My Old Name is MOHAMAD ALI which now I am changing as New Name MOHAMED ALI Hence forth My All Correspondence will be done as per my new name. Please consider the same.Sign by. MOHAMED ALI S/O MOHAMED OSMAN Address: PEER BURHAN NAGAR H NO.1-7-1310 STREET NO 3 TARODA BK Nanded 431605 Mob. 9921598839




## शांतिनिकेतन पब्लिक स्कुल मालेगाव

### शिक्षक कॉलनीच्या बाजूला मालेगाव ता.अर्धापुर जि.नांदेड

### फिस कमी गुणवत्तेची हमी

### खालील वर्गासाठी प्रवेश देणे चालू आहे.

नर्सरी ते १२ वी इंग्रजी माध्यम
१ ली ते १२ वी सेमी माध्यम
११ वी कला,वाणिज्य व विज्ञान

**प्राचार्य**
**शांतिनिकेतन पब्लिक स्कुल मालेगाव शिक्षक कॉलनीच्या बाजूला मालेगाव ता.अर्धापुर जि.नांदेड**

पंजीयान. क्र. एन. एन. डी / बी. एन. के/२२५–७४ / दिनांक. १०.०६.१९७४
जा.क्र.विकासो/२००५–२६/३९४ दिनांक २६/६/२०२६

### वीज –कामगार को–ऑप क्रेडीट सोसायटी लि नांदेड.

## लघु निविदा

संस्थेची सन २०२५–२०२६ या वर्षासाठी अहवाल छपाई साठी सर्व नामांकित मुद्राकाकडून दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

इच्छुकांनी दि.९/०७/२०२४६ पर्यंत दरपत्रके संस्थेच्या कार्यालयात दाखल करावी या निविदेचा तपशील नियम व अटी संस्थेच्या कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.

### नियम व अटी

संस्थेचा सन २०२५–२०२६ या वर्षासाठी अहवाल छपाई पुस्तिका छापावयाची आहे त्यासाठी छपाई दाराकडून निविदा मागविण्यात येत आहे याबाबत सविस्तर माहिती व अटी खालील प्रमाणे राहतील.

१) अहवाल पुस्तिका एकूण (५२) पेजेस ची राहील त्यापैकी (३६) पेजेस साधे व (१६) पेजेस आर्ट पेपर राहतील.

२) अहवाल पुस्तिका एकूण १८५० (अक्षरी एक हजार आठशे पानस फक्त ) राहील व फोटो पुस्तिकेचा दर देण्यात यावा.३) साईज : – ७९.०५ इंच ४) डिझाईनिंग : – सर्व पेज डिझायनिंग व क्रिएटिव वर्क आणि प्रुफिंग,

५) मुख्यपृष्ठ :आर्ट कार्ड ३०० जी.सी.एम. एक बाजू ग्लास लॅमिनेशन.

६) आतील पान :– पांढरे व ८०जी.सी.एम मेफलितो डबल कलर.

७) ईनर : – अतिल छपाई १३० जी.सी.एम. आर्ट पेपरवर.

८) बाईंडिंग : – सेंटर पिनिग.

९) ऑर्डर मिळाल्यापासून (५) दिवसात अहवाल छापून द्यावे लागतील जर या व्यतिरिक्त पेजेस वाढविल्यास अथवा कमी झाल्यास त्यासाठी आर्ट पेपर व साधा पेपर दर नमूद केल्याप्रमाणे पेपरचा दर हा प्रत्येक हजारासाठी देण्यात यावा.

१०) निविदेतील दर सर्व प्रकारचे करा सहित राहावेत.

**मानद सचिव**
**वीज कामगार को–ऑप क्रेडीट सोसायटी लि. नांदेड**

स्थलांतर
सिटी मॅक्स डिजिटल कलर
मो.7058766021,9422185282
गड्डम मार्केट,पहिला मजला,
शिवाजी नगर,नांदेड

गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...

किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकूण, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



# ‘स्वारातीम’ विद्यापीठात बी. एससी. हर्बल टेक्नॉलॉजी अभ्यासक्रम सुरू

## फार्मसी संकुलाचा उद्योगांसोबत महत्वपूर्ण सामंजस्य करार



**नांदेड (प्रतिनिधी)** – स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या फार्मसी संकुलात शनिवारी एक ऐतिहासिक पाऊल उचलण्यात आले. औद्योगिक क्षेत्राशी महत्त्वपूर्ण सामंजस्य करार (MoUs) करत बी. एससी. हर्बल टेक्नॉलॉजी या नव्या रोजगाराभिमुख अभ्यासक्रमाचा औपचारिक शुभारंभ करण्यात आला.

या कराराअंतर्गत नांदेड आणि छत्रपती संभाजीनगर येथील नामांकित उद्योगांसोबत विद्यापीठाने सामंजस्य करार केला आहे. गोदावरी बायोटेक इंडस्ट्री, नांदेड (दीपक मोरतळे), किरण इंडस्ट्रीज, नांदेड ( आशिष चितळे), जीवनरेखा ॲनालिटिकल सर्व्हिसेस ॲण्ड रिसर्च सेंटर, छ. संभाजीनगर (डॉ. श्रीराम सावरिकर), निओलिवा लाइफ सायन्सेस प्रा. लि., नांदेड (डॉ. अमोल शिरफुले) यां कंपन्यांसोबत फार्मसी संकुलाने स्कूल ऑफ लाईफ सायन्सेस व स्कूल ऑफ केमिकल सायन्सेस यांच्या सहकार्याने बी.एससी. हर्बल टेक्नॉलॉजी अभ्यासक्रम सुरू केला आहे.

हा अभ्यासक्रम UGC च्या pprenticeship Embedded Degree Programme(EDP)अंतर्गत राबविण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रशिक्षणाबरोबरच प्रत्यक्ष उद्योगातील अनुभवाचीही संधी मिळणार आहे.

या अभ्यासक्रमाच्या अभ्यासक्रमरचनेवर विशेष कार्यशाळेचे आयोजनही करण्यात आले. कार्यक्रमास प्र-कुलगुरु डॉ. अशोक महाजन, विद्यापीठातील विविध संकुलांचे प्राध्यापक, आणि सर्व उद्योग प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना मा. प्र-कुलगुरु डॉ. अशोक महाजन यांनी सांगितले की, रोजगाराभिमुख अभ्यासक्रमांची गरज लक्षात घेता विद्यापीठाने उद्योग-शिक्षण एकत्रित करत विद्यार्थ्यांना नव्या संधींच्या दारात नेले आहे. या उपक्रमामुळे विद्यापीठ-उद्योग सहकार्याचा उत्तम नमुना उभा राहिला आहे. त्यांनी कुलगुरु डॉ. मनोहर चासकर यांचे विशेष आभार मानले की, त्यांनी विद्यापीठात अशा नवोन्मेषी उपक्रमांसाठी नेहमी प्रेरणा दिली.

सर्व उद्योग प्रतिनिधींनी देखील या अभ्यासक्रमाबद्दल समाधान व्यक्त करत विद्यापीठासोबत सातत्यपूर्ण सहकार्याचे आश्वासन दिले. या सामंजस्य करारामुळे विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिक ज्ञानच नव्हे, तर उद्योगातील थेट प्रशिक्षण, व्यावसायिक मार्गदर्शन आणि भविष्यकालीन रोजगार संधी प्राप्त होणार आहेत. ‘स्वारातीम’ विद्यापीठाच्या या पुढाकारामुळे शिक्षण क्षेत्रात एक नवा अध्याय सुरू झाला आहे. यावेळी व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ प्रशांत पेशकर, प्रा. संगीता माकोने, अधिसभा सदस्य दीपक मोरताळे, डॉ. बाबासाहेब सुरवसे, डॉ. एस. एस. पेकमवार, डॉ. शशिकांत ढवळे, प्रा. संतोष बुटले, डॉ. राजेश क्षीरसागर, डॉ. शैलेश पटवेकर यांची उपस्थिती होती.

‘माँ गंगा गोदावरी शुद्धीकरण संकल्प अभियाना’च्या १०० व्या आठवड्यानिमित्त

# महास्वच्छता उपक्रमाचे आज आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)** – ‘माँ गंगा गोदावरी शुद्धीकरण संकल्प अभियानांतर्गत दर रविवारी गोदावरी नदी पात्रात स्वच्छता अभियान राबविले जाते. या अभियानाला दि. २९ जून रोजी शंभर आठवडे पूर्ण होत आहेत. या निमित्त रविवारी दि. २९ रोजी सकाळी सात ते नऊ दरम्यान महास्वच्छता अभियान राबविण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाला नांदेड लंगर साहीबचे संत बाबा बलविंदर सिंगजी महाराज, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव, हनुमान गडाचे संत गुरुदासजी महाराज, महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. महेश डोईफोडे, स्वच्छता विभागाचे प्रमुख तडवी, मुख्य उद्यान अधीक्षक डॉ. मिर्झा बेग यांची यावेळी प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. तसेच स्वच्छता दूतांकरिता विविध स्पर्धांचे आयोजनही करण्यात आले आहे.

नांदेडचे वैभव असलेली दक्षिणगंगा माँ गंगा गोदावरी पात्रात मोठ्या प्रमाणात प्रदूषण झाले आहे. गोदावरी नदीमधून जवळपास चौदाशे किलोमीटर पेक्षा जास्त भागातील शेती व लोक वस्तीला अविरतपणे पाणी उपलब्ध होते. परंतु मानवाच्या निष्काळजी व गैरवर्तणुकीमुळे गोदावरी नदीचे पात्र दिवसेंदिवस प्रदुषीत होत आहे. त्यामुळे नदीच्या पाण्याची प्रतही दिवसेंदिवस धोकादायक होत आहे. या सर्व बाबींची जाणीव ठेवून लोकचळवळ उभारण्यासाठी श्री स्वामी समर्थ मंदिर व अन्नछत्र तसेच नांदेड शहरातील माँ गंगा गोदावरी वर प्रेम करणाऱ्या नागरिकांच्या अथक परिश्रमातून गोदावरी स्वच्छता संकल्प अभियान मागील ९९ आठवड्यापासून अविरतपणे प्रत्येक रविवारी सकाळी सात ते नऊ या वेळेमध्ये स्वच्छता अभियान राबविण्यात येत आहे.

यामध्ये स्वच्छता घोषवाक्य स्पर्धा, खुली निबंध स्पर्धा व कोण बनेगा माँ गोदावरी का स्वच्छता दूत? अशी प्रश्नमंजुषा आयोजित करण्यात आलेली होती. पहिला गट हा वय वर्षे १८ पेक्षा कमी असणारे विद्यार्थी व दुसरा गट १८ पेक्षा जास्त वय असणारा खुला गट करण्यात आला होता. विजेत्यांना प्रथम, द्वितीय, तृतीय व उत्तेजनार्थ पारितोषिके देण्यात येणार आहेत. तसेच नांदेड मधील पर्यावरण व प्रदूषण मुक्तीसाठी काम करणाऱ्या विविध सामाजिक संस्था व संघटना प्रमुखांचा सत्कारही करण्यात येणार आहे.

या महास्वच्छता अभियानात नांदेड शहरातील सुजाण नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे आणि नांदेडची माँ गंगा गोदावरी हिला प्रदूषणापासून मुक्त करण्यासाठी सर्वांनी संकल्प करावा, असे आवाहन श्री स्वामी समर्थ मंदिर व अन्नछत्र यांच्या स्वयंसेवकांनी केले आहे.

# शंकरराव चव्हाण यांच्या स्मरणार्थ राज्यस्तरीय ज्युनियर बॅडमिंटन स्पर्धेचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)**– देशाचे माजी केंद्रीय गृहमंत्री कै. शंकरराव चव्हाण यांच्या स्मरणार्थ महाराष्ट्र राज्य बॅडमिंटन असोसिएशन अंतर्गत नांदेड शहर व जिल्हा बॅडमिंटन असोसिएशनच्यावतीने दि.१४ ते १८ जुलै दरम्यान यशवंत महाविद्यालय स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स व्हीआयपी रोड नांदेड येथे yonex-sunrise २ ज्युनिअर (१९ वर्षा खालील ) राज्यस्तरीय बॅडमिंटन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

या स्पर्धाकरिता महाराष्ट्र राज्यातून किमान तीनशे ते साडेतीनशे खेळाडूंचा सहभाग राहणार आहे. महाराष्ट्र राज्य बॅडमिंटन असोसिएशनच्या माध्यमातून या स्पर्धेत महाराष्ट्र बॅडमिंटन संघ निवडण्यात येणार आहे. तसेच नांदेड शहर व जिल्हा बॅडमिंटन असोसिएशन तर्फे घेण्यात येणारे स्पर्धेचे हे २१ वे वर्ष आहे.

ही स्पर्धा १९ वर्षा खालील मुला व मुलींसाठी एकेरी व दुहेरी व मिश्र दुहेरी या गटात आयोजित करण्यात आली आहे.

या स्पर्धेत भाग घेणाऱ्या इच्छुक खेळाडूंनी आपली नावांची दि. ७ जुलैपर्यंत www.mbasso.in या website वर नोंदणी करावी, असे आवाहन नांदेड शहर व जिल्हा बॅडमिंटन संघटनेचे अध्यक्ष डी. पी. सावंत, सचिव प्रा. महेश वाकरडकर यांनी केले आहे.

# आषाढी एकादशीसाठी विशेष रेल्वेगाड्या



**नांदेड (प्रतिनिधी)** – पंढरपूर येथे आषाढी एकादशी निमित्त होणारी प्रवाशांची गर्दी लक्षात घेऊन दक्षिण मध्य रेल्वेने पंढरपूर करीत विशेष गाड्या चलविण्याचे नियोजन केले आहे.

गाडी क्रं. ०७५१५ / ०७५१६ नगरसोल मिरज नगरसोल विशेष गाडी दोन्ही दिशेला रोटेगाव, लासूर, औरंगाबाद, जालना, परतूर, सेलू, मानवत रोड, परभणी, गंगाखेड, परळी वैजनाथ, लातूर रोड, लातूर, उस्मानाबाद, बारसी टावून, कुरडुवाडी, पंढरपूर या रेल्वे स्थानकांवर थांबणार आहे.

गाडी क्रं. ०७५०५ / ०७५०६ अकोला मिरज अकोला विशेष गाडी दोन्ही दिशेला वाशीम, हिंगोली, बसमत, पूर्णा, परभणी, गंगाखेड, परळी वैजनाथ, पानगाव, लातूर रोड, उदगीर, भालकी, बिदर, झहीराबाद, हरनगुल, विकाराबाद, तांदूर, सेरम, चीत्तपूर, वाडी, कलबुर्गी, सोलापूर, कुरडुवाडी, पंढरपूर रेल्वे स्थानकांवर थांबणार आहे.

गाडी क्रं. ०७५०१ / ०७५०२ आदिलाबाद पंढरपूर - आदूलीबाद विशेष गाडी दोन्ही दिशेला किनवट, बोधडी, धानोरा, सहस्तरकुंड, हिमायतनगर, भोकर, मूदखेड, नांदेड, पूर्णा, परभणी, गंगाखेड, परळी वैजनाथ, लातूर रोड, लातूर, उस्मानाबाद, बारसी टावून, कुरडुवाडी रेल्वे स्थानकांवर थांबणार आहे.



**नांदेड** : शिवसेना शहर संघटपदी पिंटु सुनपे व शहरप्रमुखपदी आनंद जाधव यांची निवड झाल्यानंतर खासदार प्रा. रवींद्र चव्हाण, माजी जि. प. सभापती संजय बेळगे, शिवसेना जिल्हाप्रमुख बबन बारसे, सुनील सुनपे आदींनी सुनपे आणि जाधव यांचा पुष्पहार देऊन सत्कार केला.

# शीख समाजातील गुणवंतांचा आज सत्कार

**नांदेड (प्रतिनिधी)** – महाराजा रणजीत सिंघजी यांच्या बरसी निम्मित येथील सामाजिक संघटना वारिस ए लाहौरी खालसा फौजच्यावतीने रविवारी (दि. २९ जून) दहावी आणि बारावी बोर्ड परीक्षेतील शीख समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात येणार आहे.

श्री गुरु अंगददेवजी यात्री निवास येथे सकाळी ११ वाजता सुरु होणाऱ्या या कार्यक्रमासा गुरुद्वारा तख्त सचखंड हजुर साहिबचे कथाकार ज्ञानी सुखविंदरसिंघजी, समाज कल्याण विभागाचे सहायक आयुक्त शिवानंद मिनगिरे, गुरुद्वारा बोर्डाचे अधीक्षक गुरबचन सिंघ सिलेदार यांचे मार्गदर्शन होणार आहे. या प्रसंगी दहावी आणि बारावी बोर्ड परीक्षेत गुणवंत ठरलेल्या शीख समाजातील विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात येणार आहे. या सत्कार समारंभ सोहळ्याला शीख समाजातील विद्यार्थी, पालक व नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन वारिस ए लाहौरी खालसा फौजच्यावतीने करण्यात आले आहे.

# ‘मसाप’च्यावतीने डॉ. सुरेश सावंत यांचा सत्कार



**नांदेड (प्रतिनिधी)** – बालसाहित्यिक डॉ. सुरेश सावंत यांना साहित्य अकादमीचा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल मराठवाडा साहित्य परिषद नांदेड शाखेच्या वतीने शनिवारी त्यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. यावेळी मराठवाडा साहित्य परिषदेचे नांदेड शाखा अध्यक्ष बालाजी इबितदार, कार्यवाह प्रा. महेश मोरे , सहकार्यवाह राम तरटे, ललित कला प्रतिष्ठानचे मुधोळकर , मथूताई सावंत आदींची उपस्थिती होती.

सुप्रसिद्ध बालकवी तथा लेखक, समीक्षक डॉ. सुरेश सावंत यांच्या ‘आभाळमाया’ या कविता संग्रहाला यावर्षीचा साहित्य अकादमीचा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. साहित्य क्षेत्रातील सर्वोच्च सन्मान म्हणून ओळखल्या जाणाऱ्या साहित्य अकादमीचा पुरस्कार नांदेडकरांना मिळाल्यामुळे मराठवाड्यातील साहित्यप्रेमींमध्ये आनंदाचे वातावरण आहे. नांदेड जिल्ह्याच्या साहित्य क्षेत्रात पहिल्यांदाच बालसाहित्याला डॉ. सुरेश सावंत यांच्या रूपाने साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला, ही नांदेडकरांसाठी अभिमानाची बाब असल्याचे जिल्हा अध्यक्ष बालाजी इबितदार म्हणाले. भविष्यातही डॉ. सुरेश सावंत यांच्या हातून बालसाहित्यासह मराठी साहित्याला समृद्ध करणाऱ्या साहित्याचे लेखन व्हावे अशी सदिच्छाही इबितदार यांनी यावेळी व्यक्त केली.

## अकरावीच्या विद्यार्थ्याची गळफास घेऊन आत्महत्या

**नांदेड (प्रतिनिधी)** – शहरातील अंबेकरनगरातील अकरावीत शिकणाऱ्या एका विद्यार्थ्याने छताच्या हुकाला गळफास लावून आत्महत्या केली. ही घटना शनिवारी सकाळी १० वाजता उघडकीस आली.

अकरावीत शिकणारा शुभम मुंजाजी सावंत हा आजी व बहिणी सोबत अंबेकरनगर येथे वाळकीकर यांच्या घरी भाड्याने राहत होता. त्याने खासगी शिकवणी लावली होती. पण अचानक त्याने छताच्या हुकाला दोर लावून गळफास घेतला. शनिवारी सकाळी ही घटना उघडकीस आली. या प्रकरणी विमानतळ पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. मृत्यूचे कारण अद्याप कळलेले नाही, असे पोलीस निरीक्षक गणेश चव्हाण यांनी सांगितले.

# खासदार आष्टीकर यांनी केली स्वखर्चातून रस्त्याची दुरुस्ती

**नांदेड (प्रतिनिधी)**– हदगाव शहरात मुख्य रस्त्यावर जागोजागी खड्डे पडले आहेत. त्यामुळे वयोवृद्ध नागरिक, लहान मुलांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. ही अडचण दूर करण्यासाठी खासदार नागेश पाटील आष्टीकर यांनी स्वखर्चातून रस्ता दुरुस्त करून दिला.



शहरातील राठी चौकात कैलाशचंद्र बलदवा यांच्या दुकानासमोर भला मोठा खडा पडला. त्यात पावसाचे पाणी साचल्याने खाजगी शिकवणीसाठी, शाळेत जाणाऱ्या लहान मुलांना अडचणी निर्माण होत्या. अनेकदा वयोवृद्ध नागरिक, लहान बालके पाय घसरून पडल्याच्या घटना घडल्या आहेत.

व्यापारी बांधवांनी अनेकदा नगरपालिकेत तक्रारी केल्या. पण कोणाचा पायपोस कोणाला नसल्याने जनतेला हाल अपेष्टा सहन करावा लागत होत्या. दरम्यान शुक्रवारी या बाबतीत माजी नगराध्यक्ष गणेश तोष्णीवाल यांनी शहरातील रस्त्याची दुरवस्था बाबतीत खा. नागेश पाटील यांना सविस्तर माहिती दिली. खा. नागेश पाटील आष्टीकर हे दिल्लीमध्ये होते. तरीही त्यांनी या अडचणीची तात्काळ दखल घेतली आणि शनिवारी स्वीय सहाय्यक विनोद हामणे यांना पाठवून रस्ता स्वखर्चाने दुरुस्त करून घेतला.

शहरातील राठी चौकात बलदवा यांच्या दुकानसमोर पडलेला मोठा खड्डा बुजवून रस्ता लेव्हल करून त्याची दुरुस्ती करून दिली आहे. यामुळे शनिवारी शाळेत जाणारे लहान मुले, वयोवृद्ध नागरिकांच्या चेहऱ्यावर स्मीत हास्य दिसून आले. तर व्यापाऱ्यांनी खा. आष्टीकर यांचे आभार मानले आहेत.

# नांदेड ‘इस्कॉन’च्यावतीने आज श्री जगन्नाथ रथयात्रेचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)** – आंतरराष्ट्रीय कृष्ण भावनामृत संघ (इस्कॉन) नांदेड तर्फे रविवार दि. २९ जून रोजी श्री जगन्नाथ रथयात्रा महामहोत्सव व हरिनाम संकीर्तन दिंडीचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमांना जास्तीत जास्त भाविक भक्तांनी उपस्थित राहावे व या अध्यात्मिक पर्वणीचा लाभ घ्यावा, असे आवाहन ‘इस्कॉन’च्यावतीने करण्यात आले आहे.

भगवान श्री जगन्नाथ भक्तांना दर्शन व कृपा देण्यासाठी वर्षातून एकदा रथावर आरुढ होऊन रस्त्यावर येतात. जुना मोंढा चोक येथून दुपारी एक वाजता श्री जगन्नाथ बलदेव सुभदामाई यांच्या अर्चाविग्रहाच्या महा आरतीने रथयात्रेस प्रारंभ होणार आहे. महावीर चौक, मारवाडी धर्मशाळा, एस पी ऑफीस चौक, तिरंगा चौक मार्गे हरिनाम संकीर्तन व महाप्रसाद वितरण करत भसिन मंगल कार्यालय गोवर्धन घाट येथे सायंकाळी सहा वाजता रथयात्रा पोहचणार आहे.

त्यानंतर सायंकाळी सहा ते रात्री आठ वाजेपर्यंत कथा, कीर्तन, सांस्कृतिक कार्यक्रम भरती व भव्य महाप्रसादाचे वितरण होईल.

या महोत्सवातील सत्संग कार्यक्रमात ‘इस्कॉन’ चौपाटी मुंबई येथील प्रवचनकार सत्यानंद प्रभू यांचे मार्गदर्शन होणार आहे. रविवारी सायंकाळी सहा ते रात्री नऊ दरम्यान गणेश मंदिरात सत्संग कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये हरिनाम संकीर्तन, हरिकथा आरती व महाप्रसाद वितरणाचा समावेश आहे. या रथयात्रा महामहोत्सवास जास्तीत जास्त भाविकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन नांदेड इस्कॉनच्यावतीने करण्यात आले आहे.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com